मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९८२३/अपील क्रमांक ४२५२/०२

श्रीमती रुक्मिणी पांडुरंग चाचले -----अपीलार्थी
नारायण चाळ क्र.१३, खोली क्र. २४,
१ ली कोळी गल्ली, राजवाडकर मार्ग ,
कुलाबा, मुंबई -४०० ००५,

विरुध्द

१. उपनियंत्रक -----उत्तरवादी
शिधावाटप अ- परिमंडळ,
परेल, मुंबई - १२

२. जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी
१ अ , महापालिका मार्ग , आझाद मैदान, मुंबई - १

---विवेचन---

श्रीमती. रुक्मिणी पांडूरंग चाचले यांनी आयोगाकडे दि.१८/३/२००९ रोजी दाखल केलेल्या अपीलाची सुनावणी दि. ४ मे, २००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीनी दि. २९/४/२००९ रोजी आयोगास पत्र लिहून त्यांना हवी असणारी माहिती मिळाली असल्यामुळे त्या समाधानी आहेत व दुसरे अपील रद्द करण्यात यावे अशी विनंती केलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ४ मे, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३६१७१/अपील क्रमांक ४२५१/०२

श्री.नामदेव संतोबा वाघ -----अपीलार्थी
एन के.टी कॉलेज कोर्ट नाका,
जि. ठाणे.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी
पोलीस महासंचालक कार्यालय (का.व सु)
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा.

२. जन माहिती अधिकारी
पोलीस महासंचालक कार्यालय (का.व सु)
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा.

---विवेचन---

अपीलार्थी श्रीयुत नामदेव संतोबा वाघ यांनी आयोगाकडे दि. २/४/२००९ रोजी सुधारित द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. ४/५/२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीस प्राचार्य सुधीर वडवळकर यांनी एलिजीबिलीटी फॉर्ममध्ये डयूपलिकेट सही केली ही तक्रार कोणत्या भारतीय कायद्यानुसार पोलीस कक्षेत येत नाही त्या कायद्याची माहिती द्यावी व अपीलार्थींनी उपस्थित केलेले मुद्दे हे "माहिती " या संज्ञेत येत नाही हे जन माहिती अधिका-यांचे मत अपिलीय अधिका-यांनी ग्राहय ठरविले होते त्याविरुध्द सदरचे अपील आहे.

अपीलार्थींनी ज्या पध्दतीने माहिती विचारलेली आहे ती एकर तर उलट तपासणी व प्रश्नांगत माहिती या स्वरुपाची आहे. त्यामुळे ती "माहिती " या संज्ञेत येत नाही हे खरे

आहे. मात्र अपीलार्थींचा जो मुळ मुद्दा आहे त्याबाबतीत अप्पर पोलीस अधीक्षक यांनी पोलीस महासंचालकांना जो दि. १६/११/२००७ रोजीचा अहवाल पाठविलेला आहे त्या अहवालाची प्रत जरी जन माहिती अधिकारी सांगत असले की या अहवालाची प्रत अप्पर पोलीस अधीक्षक नांदडे यांनी अपीलार्थीस दिली असावी पण एक आणखीन जादा प्रत अपीलार्थीस दिली तर काही बिघडणार नाही. तेव्हा या पत्राची प्रत अपीलार्थीस देण्यात यावी. त्यातून त्यांची जी मुळ तक्रार होती त्या तक्रारीसंबंधी पोलीस विभागाकडून काय कारवाई करण्यात आली आहे याची माहिती त्यांना होवू शकते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

**---आदेश---**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दि. १६/११/२००७ रोजीची अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या पत्राची प्रत अपीलार्थीस द्यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ४ मे, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३९८२१/अपील क्रमांक ४२५५/०२**

**श्री. अशोक दिवान -----अपीलार्थी**
**३/३१५, पार्क व्हयू, यारी रोड,**
**अंधेरी (पश्चिम) मुंबई --- ४०० ०६१.**

**विरुध्द**

**१. उपमुख्य अभियंता -----उत्तरवादी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१**

**२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१**

**---विवेचन---**

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १८ मार्च, २००९**
**सुनावणीची तारीख ४/५/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे उपस्थित.**

अपीलार्थीचे म्हणणे त्यांना समाधानकारक माहिती मिळाली नाही. असे जरी असले तरी जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार अपीलार्थीच्या दि. ३/१०/२००८ रोजीच्या अर्जावर दि. १७/१०/२००८ रोजी त्यांना माहितीसाठी रु.४/- भरण्याचे पत्र पाठविले आहे व अपीलार्थीस ते मिळालेले आहे. पण अपीलार्थीनी अजून रक्कम न भरल्यामुळे माहिती देता आलेली नाही. दि. १४/११/२००८ व दि. ७/११/२००८ रोजीचा अर्ज व दि. ८/१२/२००८ रोजी उत्तर पाठविण्यात आले व अपीलार्थीस नस्तीचे अवलोकन करण्याचे व कागदपत्रे

निवडण्याची विनंती करण्यात आलेली आहे. पण अपीलार्थींनी अजूनहि नस्तीचे इन्स्पेक्शन घेतलेले नाही. त्यामुळे अपीलार्थीस हवी असणारी माहिती देता आलेली नाही.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थींनी माहितीसाठीचे शुल्क भरावे. तसेच जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयात जावून नस्तीचे इन्स्पेक्शन घेवून कागदपत्रे निवडण्याचे मान्य केले. त्यानंतर अपीलार्थीस त्यांनी निवडलेल्या कागदपत्रांच्या प्रती देण्यात याव्यात असे ठरविण्यात आले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ५ मे, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३९८२०/अपील क्रमांक ४२५६/०२**

**श्री. अशोक दिवान -----अपीलार्थी**
**३/३१५, पार्क व्हयू, यारी रोड,**
**अंधेरी (पश्चिम) मुंबई --- ४०० ०६१.**

**विरुध्द**

**१. सचिव -----उत्तरवादी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१**

**२. जन माहिती अधिकारी तथा विधी सल्लागार**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१**

**---विवेचन---**

अपीलार्थी श्री. अशोक दिवान यांनी झोपडपट्टी प्राधिकरणामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दि. ५/११/२००८ रोजी अर्ज दाखल करुन अभिप्राय स्वरुपाची माहिती मागविली होती. सदर अर्ज प्राधिकरणातील विधी विभागाकडून दि. १५/ङ१/२००८ रोजी अभियांत्रिकी विभागास प्राप्त झाला व माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि. १९/१२/२००८ रोजी अपील अर्ज दाखल केला. सदर अर्जावर दि. १४/१/२००९ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती.

सदर अपीलाचा निर्णय न मिळाल्याने अपीलार्थी यानी आयोगाकडे दि. १८ मार्च, २००९ रोजी द्वितीय अपील सादर केले त्याची सुनावणी दि. ४ मे, २००९ रोजी घेण्यांत

आली.     त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.     सुनावणीच्या वेळेला अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

अपीलार्थी श्री. अशोक दिवान यांनी दि. २७/१०/२००८ रोजी झोपडपट्टी प्राधिकरणामध्ये निवेदन दाखल करुन न.भू.क्र. ३०५, ३०५/१ ते ७, मौजे विलेपार्ले तालुका अंधेरी या भूखंडावर सदाशिव सह.गृह.नि. संस्थेमार्फत राबविणेत येणा-या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत आक्षेप घेवून सदर योजना मंजूर करतांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने विचारात घेतलेल्या मुखत्यारनामाबाबत अभिप्राय स्वरुपाची माहिती मागविली होती.

सबब सदर अपील अर्जाच्या सुनावणीस अपीलार्थी यांचे निवेदन /म्हणणे ऐकून घेऊन त्यांचे निवेदन दि. २७/१०/२००८ व संदर्भाधिन अर्ज झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील पत्र दि. २८/१/२००९ रोजी प्राधिकरणाचे वकील श्री. गिरीष उटांगळे यांचेकडे अभिप्रायासाठी पाठविणेत आले होते.   त्यानुसार वकील श्री. गिरीष उटांगळे यांनी दि. १७/२/२००९ रोजी सदर विषयाबाबत त्यांचे कायदेशीर अभिप्राय दिले.

सदर अभिप्रायानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील पत्र दि. ४/४/२००९ अन्वये अपीलार्थी श्री. अशोक दिवान यांना त्यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर तसेच त्यांचे निवेदन दि. २७/१०/२००८ ला अनुसरुन अपीलार्थी यांना अभिप्राय कळविले आहे.

उपरोक्त बाबीचा विचार करता अपीलार्थी यांचे निवेदनावर तसेच अर्जावर कायदेशीर अभिप्राय घेऊन अपीलार्थी यांना माहिती कळविली असल्यामुळे जन माहिती अधिकारी तसेच अपिलीय अधिकारी यांचेकडून विलंब झालेला नाही.

माहितीच्या अधिकारात कायदेशीर अभियांत्रिक तक्रार म्हणून घेवून पाठविणे जरी अभिप्रेत नसले तरी अपीलार्थीचे संपूर्ण अचुक समाधान करण्याच्या दृष्टीने प्राधिकरणाने कायदेशीर मत मागवून त्या आधारावर वस्तुस्थिती स्पष्ट केलेली आहे.   त्यामुळे कायदेशीर मत घेण्यात झालेला वेळ वजा करता विलंब झालेला दिसून येत नाही.    प्राधिकरणाच्या निर्णयावर अपीलार्थीचे आक्षेप आले असे प्राधिकरणाचे म्हणणे अपीलार्थीस आता कळालेले

आहेत. त्यामुळे माहिती देण्याच्या बाबतीत योग्यती कार्यवाही करण्यात आलेली आहे असे आयोगास वाटते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ५ मे, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९८१७/अपील क्रमांक ४२५८/०२
क्रमांक-मु.मा.आ/३९८१८/अपील क्रमांक ४२५९/०२
क्रमांक-मु.मा.आ/३९८१९/अपील क्रमांक ४२६०/०२

श्री. सुरेंद्र दिनानाथ पिंपळे -----अपीलार्थी
३२/७०३,७०४, मालवणी सृष्टी को.ऑप.हौ.सो.लि.
राजे शिवाजी संकुल, म्हाडा कॉम्प्लेक्स,
एकता नगर, कांदिवली (पश्चिम) मुंबई - ४०० ०६७.

विरुध्द

१. उपनिबंधक (श्रेणी १) -----उत्तरवादी
सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.

२. जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक
सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.

---विवेचन---

अपीलाचा दिनांक १८ मार्च, २००९
सुनावणीची तारीख ५ मे, २००९
अपीलार्थी , अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस मालवणी सृष्टी को.ऑप.हौसिंग सोसायटी लि. या संस्थेच्या बाबतीत को.ऑप.सोसायटी ॲक्टच्या कलम ८३ अन्वये केलेल्या चौकशी अहवालाची प्रत, व चौकशी अधिकारी यांचा मेहनताना यासंबंधी तसेच कलम ८९ नुसार केलेली कारवाई ,

अहवालाची प्रत  व कार्यकारी सदस्यांनी बंधपत्र देणे बंधनकारक व तसे बंधपत्र न दिल्यास होणारी कारवाई याबाबतची माहिती पाहिजे होती.

अपीलार्थीस कांही माहिती देण्यात आलेली आहे.   जी माहिती अजून दिलेली नाही ती म्हणजे कलम ८३ अन्वये चौकशी अहवालाची प्रत दिल्यानंतर त्या पुढची झालेली कारवाईची माहिती पाहिजे आहे.  ती देण्याचे निर्देश देण्यांत आले.  कलम ८९ अन्वयेच्या संदर्भात धारिका कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध आहे असे अपीलार्थीस कळविले त्यासंबंधीचे कागदपत्र  अपीलार्थीस देण्याचे आदेश देण्यात आले.   बंधपत्र न दिल्याने सोसायटीची कार्यकारीणी बरखास्त करुन त्याठिकाणी नुकताच प्रशासक नेमण्यात आलेला आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

अपीलार्थीस उरलेली सर्व माहिती ही जन माहिती अधिकारी यांनी  दि. २० मे, २००९ पर्यंत द्यावी असे निर्देश देण्यात येत आहेत.

***---आदेश---***

तिन्ही अपीले अंशतः मान्य करण्यात येत आहेत.
जन माहिती अधिकारी यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक.  ५ मे, २००९          राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३९८२४/अपील क्रमांक ४२५३/०२**

**श्री. मनोज एम. कारंडे -----अपीलार्थी**
**१, ज्योत्सना प्रकाश, १ ला मजला,**
**सिंडीकेट बॅकेसमोर, गोरेगांव रेल्वे स्टेशनजवळ,**
**गोरेगांव (पूर्व) मुंबई - ४०० ०६३.**

**विरुध्द**

**१. उपनिबंधक (श्रेणी १) -----उत्तरवादी**
**सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.**

**२. जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक**
**सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.**

**---विवेचन---**

**अपीलाचा दिनांक १७ मार्च, २००९**
**सुनावणीची तारीख ४ मे, व ५ मे, २००९**
**अपीलार्थी दि.४ मे,२००९ व अपिलीय अधिकारी दि. ५ मे, २००९ रोजी उपस्थित.**

अपीलार्थीस के-३, के-४ को.ऑप.हौसिंग सोसायटी व नंतर निर्माण झालेल्या नेपच्यून को.ऑप.हौसिंग सोसायटीच्या सर्टिफिकेट ऑफ अमलगमेशन याबाबतीत माहिती पाहिजे होती.

त्यातील कांही माहिती अपीलार्थींना देण्यात आलेली आहे. मात्र मुद्दा क्र. १,२,४ ची माहिती मिळालेली नाही असे अपीलार्थींचे म्हणणे आहे.

सध्या जन माहिती अधिक्‍ारी निवडणुकीच्या कामात व्यस्त आहेत त्यामुळे १५ दिवसांत म्हणजेच २० मे २००९ पर्यंत अपीलार्थीस माहिती देण्यात येईल असे अपिलीय अधिकारी यांनी मान्य केले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

उपरनिर्दिष्टाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ५ मे, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३९९८२/अपील क्रमांक ४२६१/०२**

**श्री. किसनराव केशव मरगजे -----अपीलार्थी**
**भाडे संकलक (मालमत्ता)**
**एन विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व) मुंबई - ४०० ०७७.**

**विरुध्द**

**१. सह आयुक्त (सुधार) -----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१.**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (मालमत्ता)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**छत्रपती शिवाजी मंडई इमारत, दुसरा मजला,**
**पलटन रोड, मुंबई - ४०० ००१.**

**---विवेचन---**

**अपीलातील त्रुटी दुर करुन अपील सादर केल्याचा दिनांक २१ एप्रिल, २००९**
**सुनावणीची तारीख ५ मे, २००९**
**अपीलार्थी व जनमाहिती अधिकारी उपस्थित.**

श्रीयुत किसनराव केशव मरगजे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका यांना त्यांच्या दि. १७/६/२००८ रोजीच्या अर्जानुसार जो अर्ज सादर केला आहे तो राज्य शासनाने विहित केलेल्या नमुन्यात नाही तरी पण यावरुन अपीलार्थीस माहिती काय पाहिजे याची कल्पना येवू शकते. त्या अर्जानुसार त्यांना ३२ वर्षे सेवा होवून त्यांना प्रमोशन का प्राप्त होऊ शकले नाही यासंबंधीची माहिती पाहिजे होती. ही माहिती त्यांना दि. ४/७/२००८ रोजीच्या पत्राने

देण्यांत आली. मात्र त्या माहितीने समाधान न झाल्यामळे प्रथम अपील व द्वितीय अपील सादर केलेले आहे.

मात्र अनेक अर्ज करुनहि प्रमोशन मिळालेले नाही म्हणून त्यांनी माहितीच्या अधिकाराचा आश्रय घेतलेला दिसतो.

अपीलार्थीस मिळावयाचे सुपरवायझरचे प्रमोशन आहे. त्या पोष्टमध्ये ७५ टक्के पोष्ट या नामनिर्देशाने व २५ टक्के प्रमोशन कोटयातून भरल्या जातात. अपीलार्थीस प्रमोशन कोटयातून प्रमोशन द्यायचे असल्यामुळे अजूनहि सिनिअरटीत त्यांच्या वरचे कर्मचारी असल्यामुळे त्यांना प्रमोशन प्राप्त होवू शकले नाही ही वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी सांगितली.

अपीलार्थींना जी सिनिअरटी लिस्ट पाहिजे आहे ती त्यांनी शुल्क भरल्यास त्यांना मिळू शकेल. याउप्परहि सुनावणीच्या वेळेला अपीलार्थीच्या मुळ पदावरील कन्फर्मेशन, टाईम बाउंड प्रमोशनची शक्यता या बाबतीत लक्ष घालण्याचे जन माहिती अधिका-यांनी विदित केले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ५ मे, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९७४२/अपील क्रमांक ४२६५/०२

श्री. नामदेव काशिनाथ कांबळे -----अपीलार्थी
रामेश्वर चाळ कमिटी, युनिट क्र. १५५९,
संदेश नगर बैलबाजार, कुर्ला अंधेरी रोड,
मुंबई - ४०० ०७२.

विरुध्द

१. सहायक मनपा आयुक्त -----उत्तरवादी
टी विभाग कार्यालय, लाला देवीदयाल मार्ग,
मुलुंड (पश्चिम) मुंबई ४०० ०८०.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (परिरक्षण)
टी विभाग कार्यालय, लाला देवीदयाल मार्ग,
मुलुंड (पश्चिम) मुंबई ४०० ०८०.

---विवेचन---

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २६ मार्च, २००९
सुनावणीची तारीख ५/५/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्रीयुत नामदेव काशिनाथ कांबळे यांनी दि.६/११/२००८ रोजी परिरक्षण खाते टी विाग यांच्या खात्याअंतर्गत होणा-या कामासंबंधी ठेकेदारांची नांवे, तसेच त्यांच्या चौक्यासंबंधी व चौकीशेजारी ठेकेदारांच्या राहणा-या कामगारांची माहिती विचारली होती.

ही माहिती अपीलार्थीस रेकॉर्डप्रमाणे देण्यात आलेली आहे. दिलेल्या माहितीने अपीलार्थींचे समाधान होत नसेल तर त्यांनी नस्तीची प्रत्यक्ष पाहणी करावी व उर्वरित

कागदपत्रांच्या प्रती सुध्दा प्राप्त करुन घ्याव्यात. सकृतदर्शनी माहिती दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ६ मे, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९७३३/अपील क्रमांक ४२६८/०२

श्री. निखील बी. मेहता -----अपीलार्थी
१५- बी, नागू सयाजी मार्ग,
बाळाराम स्ट्रिट, ग्रँट रोड, मुंबई ४०० ००७.

विरुध्द

१. उपमुख्य अभियंता -----उत्तरवादी
उपमुख्य अभियंता डी-२ यांचे कार्यालय,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
८९-९५, रजनी महल ताडदेव, मुंबई ३४

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
उपमुख्य अभियंता डी-२ यांचे कार्यालय,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
८९-९५, रजनी महल ताडदेव, मुंबई ३४

---विवेचन---

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २५ मार्च, २००९
सुनावणीची तारीख ६/५/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस पुढील माहिती पाहिजे होती.

सर्वे नं. १५४, ताडदेव विभाग येथील जुन्या भाडेकरुंना नविन इमारतीमध्ये कोठे स्थलांतर केले व त्यांना किती चौरस फूट जागा दिली १ (चाळ क्र.१,२,३,४,५,६,६-ए, ७ आणि ८) व मे. निलेश के. कडाकिया यांनी दि. २६/७/२००४ , १६/८/२००४,

९/१०/२००४ आणि १२/२/२००५ रोजी महिन्याचे प्रोग्रेस रिपोर्ट -एक्झीक्युटीव्ह इंजिनियर डी-२ विभाग येथे सादर केलेले आहे याची खरी नक्कल प्रत.

अपीलार्थीस जुन्या भाडेकरुला नवीन इमारतीत कोठे ब्लॉक मिळणार आहे याबाबतची यादी विकासक हे भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर करतेवेळी त्यांच्या कार्यालयास सादर करतात म्हणून आजघडीस ही माहिती उपलब्ध नाही म्हणून कळविले. तसेच अपीलार्थीच्या म्हणण्याप्रमाणे श्री. कडाकिया यांनी त्या कार्यालयाकडे पाठविलेले पत्र हे त्यांच्याकडे प्राप्त झाले नसल्यामुळे उपलब्ध करुन देता येत नाही असेहि कळविले. त्यामुळे जी माहिती कार्यालयात उपलब्धच नाही व त्यातील कांही माहिती यथाक्रम नसून प्राप्त होणार आहे ती यावेळेस देता येणार नाही हे म्हणणे मान्य करावे लागेल. याबाबत अपीलार्थीनी नस्तीची पाहणी सुध्दा केलेली आहे व माहिती उपलब्ध नाही याची खात्री करुन घेतलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ६ मे, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९७४४/अपील क्रमांक ४२७४/०२

श्रीमती. सुरेखा बबन मोरे -----अपीलार्थी
८२/५६, वरळी बी.डी.डी. चाळ,
हुतात्मा रमेश देवरुखकर मार्ग, मुबई -- ४०००१८.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त - परिमंडळ ३ -----उत्तरवादी
मध्य नियंत्रण कक्ष, बावला कंपाऊंड,
डॉ. बी.अे. रोड. भायखळा (पूर्व) मुंबई - २७

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
मध्य नियंत्रण कक्ष, बावला कंपाऊंड,
डॉ. बी.अे. रोड. भायखळा (पूर्व) मुंबई - २७

---विवेचन---

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २६ मार्च, २००९
सुनावणीची तारीख ६/५/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ३ अन्वये माहिती मिळविण्याकरीता दि. १४/१०/२००८ रोजीचा मुळ अर्ज दि. १४/१०/०८ रोजी जन माहिती अधिकारी कार्यालयात प्राप्त झाला होता.

अपीलार्थी यांनी त्यांचे मुळ अर्जात मुद्दा क्र. १. बी.डी.डी. चाळ क्र. ५९, खोली क्र. ६७ च्या भाडेदारी हस्तांतरण प्रकरणी बेकायदेशीर बनावट कागदपत्रे वापरुन त्यांचेवर झ ालेल्या अन्यायाबाबतच्या निवारणाकरीता एफ.आय.आर नोंदविण्याकरीता वरिष्ठ पोलीस

निरीक्षक वरळी पोलीस ठाणे, वरळी, मुंबई येथे दि. २७/८/२००८ रोजीचा अर्ज तसेच मा.ना. श्री.आर.आर. पाटील, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री ,महाराष्ट्र राज्य यांना सादर केलेले अर्ज, तसेच मा.खासदार श्री.रामदास आठवले यांचे दि. ३/१/२००८ रोजीचे पत्र व सदर पत्रासोबत अपीलार्थी यांचा दि. ३/१/२००८ रोजीचा अर्ज यावरील अर्जाच्या एकूण कारवाईच्या अहवालाच्या साक्षांकित प्रती मिळाव्या म्हणून अर्ज. मुद्दा क्र.२ अपीलार्थी यांचा दि. २७/८/०७ रोजीच्या अनुषंगाने केलेल्या विशेष तपास, कारवाई अहवालाच्या साक्षांकित प्रती नोंदविलेल्या एफ.आय.आर च्या नोंदीसहीत माहिती. मुद्दा क्र.३ - व्यवस्थापक विकाव विभाग चाळ, वरळी मुंबई यांचे पत्र क्र. ईव्हीएन/३००१/२००७ दि. २७/१२/०७ च्या पत्राची प्रत वरिष्ठ पोलीस निरीक्षक वरळी पोलीस ठाणे यांनी सदर अर्जाच्या अनुषंगाने केलेला तपास व कार्यवाहीच्या अहवालाच्या साक्षांकित प्रती. मुद्दा क्र.४ वरळी पोलीस ठाणे जा.क्र.८८९१/०८ दि. ९/८/२००८ च्या पत्राची साक्षांकित प्रत मुद्दा क्र.५. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, मुंबई यांचे जा.क्र. ३१३१/०८ दि. ९/९/०८ , स्वीय सहायक-उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांना सादर केलेल्या पत्राची साक्षांकित प्रत सर्व मुळ अर्जाच्या साक्षांकित प्रती. मुद्दा क्र.६ - संचालक मुंबई विकास विभाग चाळी, वरळी, मुंबई १८ यांच्याकडून जा.क्र.८८९१/०८ दि. ९/८/०८ अन्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक वरळी पोलीस ठाणे यांनी अभिप्राय अथवा खुलासा, बनावट कागदपत्रा विषयी मागितलेला खुलासा अथवा अभिप्रायाची प्रत व त्यावरील कारवाईची साक्षांकित प्रत. याबाबतची मागणी केली होती. सदर बाबत वरळी पोलीस ठाणे यांचे जा.क्र. ११९९८/०८ दि. ११/११/२००८ अन्वये जन माहिती अधिकारी कार्यालयात प्राप्त झाला होता. सदर बाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वरळी पोलीस ठाणे यांनी त्यांचे दिलेले अहवालामध्ये वरळी बी.डी.डी. चाळी, वरळी मुंबई गणपतराव जाधव मार्ग, वरळी, मुंबई यांचेकडून निर्गमित केले जात असून श्री. दिगंबर खरात यांनी भाडेदारी हस्तांतरणाबाबत सादर केलेल्या दस्तऐवजाचे सत्यतेबाबत माहिती मिळविणेकरीता संचालक, मुंबई विकास विभाग चाळी, यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आलेला असून त्यांचा अहवाल अद्याप प्राप्त झाला नसल्याने संबंधितांवर कारवाई करणे शक्य झाले नाही. तसेच दि. १६/७/०७ रोजी अपीलार्थी

श्रीमती. सुरेखा बबन मोरे यांना मारहाण अथवा शारिरीक छळ झाल्याबाबत कोणतीही तक्रार दाखल केलेली नाही. तसेच दि. २२/८/०७ रोजी खोलीच्या मालकी हक्कावरुन अपीलार्थी व त्यांचे नातेवाईकांमध्ये शिवीगाळ झाल्या बाबत अदखलपात्र गुन्हे वरळी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, यांचे कार्यालयातील दि. ९/९/०८ रोजी स्वीय सहायक मा.उप-मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय मुंबई यांचेशी अपीलार्थी यांनी दि. ३/१/०८ रोजी केलेल्या तक्रार अर्जाच्या अहवालाची साक्षांकित प्रत अपीलार्थी यांना देण्यात आलेली आहे. सदर अहवालामध्ये अपीलार्थी यांनी त्यांचे वडिलांनी बनावट कागदपत्र सादर करुन नमूद खोलीचे भाडेकरु हस्तांतरण स्वतःचे नांवे केलेल्या तक्रारीमध्ये तथ्य दिसून येत नाही.

सदर माहिती अपीलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्यावर दि. १२/११/०८ रोजी व दि. १३/११/०८ रोजी त्यांचे भ्रमणध्वनीवर जन माहिती अधिकारी कार्यालयाने फोन करुन माहिती घेवून जाण्याबाबत सूचना दिल्या. सदर बाबत दि. १४/११/०८ रोजी अपीलार्थी स्वतः कार्यालयात येवून त्यांनी शासनाचे योग्य ते शुल्क ३०/- रुपये भरुन १५ पृष्ठांचे माहिती घेवून गेल्या.

सदर माहितीने अपीलार्थी यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ८/१२/०८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल केले होते. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयीन जा.क्र. ४१८०/पोउआ/परि.३/वा/०८ दिनांक १०/१२/०८ अन्वये सदर अपील अर्जाची सुनावणी दि. २६/१२/०८ रोजी सायंकाळी १७-०० वाजता ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीच्या दिवशी अपीलार्थी यांचे पतीने अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थीने वरळी पोलीस ठाणेस दिलेल्या अर्जावरुन दखलपात्र गुन्हा का दाखल केला नाही याबाबत विचारणा केली. परंतु वरळी पोलीस ठाणेच्या वतीने हजर असलेले सपोनि सोनावणे यांनी सांगितले की, अपीलार्थी यांचे अर्जाचे चौकशीवरुन दखलपात्र गुन्हा निष्पन्न होत नसल्याचे लेखी लिहून दिले. तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक वरळी पोलीस ठाणे यांनी संचालक मुंबई विकास विभाग चाळी यांचे कार्यालयातून दि. १०/१२/०८ रोजीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वरळी पोलीस ठाणे यांना अपीलार्थी यांनी वरळी

बी.डी.डी. चाळ क्र. ५९/६७ च्या भाडेदारी हस्तांतरण आदेशाच्या सत्यतेबाबतची अहवालाची प्रत अपीलार्थी यांना त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवून त्या अहवालाची प्रत सुध्दा त्यांना देण्यात आलेली आहे. सदर अहवालामध्ये संचालक मुंबई विकास विभाग चाळी सन २००६ नंतर श्रीमती. सुरेखा बबन मोरे हया त्यांचे पती श्री. बबन मोरे यांचे नांवे बी.डी.डी चाळीतील चाळ क्र. ८२, खो.क्र. ५६ या ठिकाणी रहात होत्या असे दिसून येते. तसेच खोली क्र. ६७ मुंबई विकास चाळ क्रमांक ५९ वरळीची भाडेदारी सद्य:स्थिती श्री. दिगंबर मानाजी खरात यांचे नांवे असून ती त्यांचे नांवे दि. ११/११/२००४ रोजी झालेली आहे. अपीलार्थी यांना सदर माहिती देवून अपील निकाली काढण्यात आलेले आहे.

सुनावणीच्या वेळेला असे दिसून आले की, याबाबत पोलीस स्टेशनमध्ये व जन माहिती अधिकारी कार्यालयात जी माहिती या विषयावर आहे ती सर्व माहिती अपीलार्थीस देण्यात आलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ६ मे, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३९७४८/अपील क्रमांक ४२७७/०२**

**श्री.भूपेंद्र गंगादास शाह -----अपीलार्थी**
**द्वारा- अरविंद अेच शाह, २४ रिज रोड,**
**अमरज्योती-५, मुंबई - ४०० ००६.**

**विरुध्द**

**१. पोलीस उप आयुक्त - परिमंडळ २ -----उत्तरवादी**
**दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय इमारत,**
**सर जे.जे. मार्ग, नागपाडा, मुंबई - ४०० ००८.**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय इमारत,**
**सर जे.जे. मार्ग, नागपाडा, मुंबई - ४०० ००८.**

**---विवेचन---**

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २५ मार्च, २००९**
**सुनावणीची तारीख ६/५/२००९**
**अपीलार्थी यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थींनी दि. २६ नोव्हेंबर, २००८ रोजी मलबार हिल पोलीस स्टेशनला त्यांच्या वाटयाला येणारी त्यांचे वडिलोपार्जित शेअर्स हे गहाळ झालेले दिसतात व ते शेअर्स श्री.महेंद्र नगीनदास शहा यांच्याकडे आहेत. तेव्हा ते मिळवून देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी अशी विनंती केलेली होती व यासंदर्भात माहितीच्या अधिकाराखाली वरील अर्जावर काय कारवाई केली ही माहिती विचारली होती.**

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपीलार्थीस दि. २९/११/२००८ रोजीच्या अर्जास अनुसरुन दि. २०/१२/२००८ रोजी संबंधित पोलीस स्टेशनकडून आलेली पोलीस अहवालाची प्रत पाठविण्यात आली. त्यावरुन असे दिसून येते की, सदरील तक्रार अर्जाच्या अनुषंगाने चौकशी अजूनहि चालू आहे व गैरअर्जदार श्री. महेंद्र नगीनदास शहा यांचे जबाब नोंदवून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

सुनावणीच्या वेळेला हेहि स्पष्ट झाले की, तद्नंतर अपीलार्थीस दि. ८/१/२००९ रोजीच्या पत्राने सदरील प्रकरणी केलेल्या चौकशीमध्ये सदरची बाब ही दिवाणी स्वरुपाची दिसून येत असल्याने अपीलार्थींनी संबंधित न्यायालयात दाद मागावी अशा आशयाचे पत्रहि अपीलार्थीस पाठविण्यात आलेले आहे. त्यामुळे रेकॉर्डला जी माहिती आहे ती संपूर्ण दिल्याचे दिसून येते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ७ मे, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९८१२/अपील क्रमांक ४२८१/०२

श्री.राजकुमार प्रताप सिंग -----अपीलार्थी
२३/ बी, मेहेर अपार्टमेंटस,
ॲनेस्टी रोड, मुंबई - ४०० ०२६.

विरुध्द

१. उप सचिव (का-२३ ) -----उत्तरवादी
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

२. जन माहिती अधिकारी तथा निवास व्यवस्था नियंत्रक
(कार्यासन २३ )
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

---विवेचन---

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १९ मार्च, २००९
सुनावणीची तारीख ७/५/२००९
अपीलार्थी , अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

कॉमर्स सेंटरमध्ये जी जागा सध्या कामगार आयुक्त कार्यालय यांच्या ताब्यात आहे त्यासंदर्भात बिल्डर्स/ ओनर्स आणि राज्य शासन यांच्यामध्ये झालेल्या लिज ॲग्रीमेंटची प्रत अपीलार्थीस पाहिजे आहे.

यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाचे दि. १४ मे, १९६६ परिपत्रक उपलब्ध आहे त्यानुसार सेल्स टॅक्स विभाग त्या बिल्डींगमधून निघाल्यानंतर ज्यांना या प्रिमायसेस द्यायच्या

त्याबाबतीत  सामान्य प्रशासन विभागाने परिपत्रक जारी केले आहे.   यापेक्षा जास्त माहिती विभागाकडे प्रयत्न करुनहि सापडत नाही असेच दिसून येते.

जारीने शोध घेवूनहि व सदरील विषयावरील कुठचीही कागदपत्रे  दिसून येत नाहीत असे विभागाचे म्हणणे आहे.    शेवटचा प्रयत्न म्हणून  आरकाईव्हस्  विभागात सदरील कागदपत्रे मिळून येतात का यासंबंधी चौकशी करावी  व अपीलार्थीस हवी असलेली कागदपत्रे सापडल्यास ती त्यांना देण्यात यावीत.   सदरची कारवाई एक महिन्याच्या आत पूर्ण करावी व तसे अपीलार्थीस कळवावे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक.  ७ मे, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९६६९/अपील क्रमांक ४२८२/०२

श्री. सतीश रघुनाथराव ठाकरे -----अपीलार्थी
कावेरी - १६ , शासकीय अधिकारी निवासस्थान,
खा.अ. गफारखान मार्ग, सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०३०.

विरुध्द

१. कार्यकारी अभियंता -----उत्तरवादी
मध्य मुंबई सार्वजनिक बांधकाम विभाग,
गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई - १८.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग उपविभाग क्र.१
गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई - १८.

---विवेचन---

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ३० मार्च, २००९
सुनावणीची तारीख ७/५/२००९
अपीलार्थी , अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस गोमती, शरावती, कावेरी या वरळी , शासकीय निवासस्थानांची देखभाल दुरुस्ती अंतर्गत केलेल्या कामाची व झालेल्या खर्चाच्या गेल्या ४ वर्षापर्यंतची माहिती पाहिजे होती. ही माहिती बरीच विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे यासंदर्भात प्रथम अपीलाची सुनावणी झाली होती त्यावेळैला अर्जातील मागणीची व्याप्ती अपीलार्थींनी बरीच कमी केली व त्याप्रमाणे अपीलार्थीस दि. ६/५/२००९ रोजी पोष्टाने माहिती पाठविण्यांत

आली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेस सांगितले. तसेच सदर माहितीची प्रत सुनावणीच्या वेळेस सोबत आणली होती ती अपीलार्थीस देण्यांत आली.

या निवासस्थानात राहणा-या शासकीय कर्मचा-यांच्या दुरुस्ती व देखभालीसंबंधीच्या अडचणींच्या बाबतीत सुध्दा कार्यवाही करण्यात येत असल्याचे सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

---*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ७ मे, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९८८१/अपील क्रमांक ४२९०/०२

श्री. विजय के. चौहान -----अपीलार्थी
२ अे, सन अँड सी अपार्टमंटस,
रॉयल लेन जवळ, जुहू तारा रोड,
सांताक्रुज (पश्चिम) मुंबई ४०० ०४९.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ९ -----उत्तरवादी
हिल रोड, बांद्रा (पश्चिम) मुंबई

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड,
बांद्रा (पश्चिम) मुंबई - ४०० ०५०.

---विवेचन---

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ४ एप्रिल , २००९
सुनावणीची तारीख ७/५/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. विजय चौहाण यांनी दि. ३/१/२००९ रोजी जो तक्रार अर्ज खेरवाडी पोलीस ठाण्यास दिलेला होता त्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेली कारवाई व सद्य:स्थितीची माहिती अपीलार्थींना त्यांच्या दि. १३ जानेवारी २००९ रोजीच्या अर्जाने मागितली होती. अपीलार्थींच्या दि. ३/१/२००९ रोजीच्या अर्जात त्यांनी सहकार खात्याच्या जनसेवकांकडून फोरजरी सोसायटीच्या रेकॉर्डचा नाश करणे, अपीलार्थीस धमकया देणे वगैरे बाबतीत तक्रार केली होती.

वरील माहितीच्या अधिकारातील अर्जास दि. ६/२/२००९ रोजी माहिती देण्यांत आली. दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे दि. १६ फेब्रूवारी. २००९ रोजीच्या अपीलावर दि. ९/३/२००९ रोजी निर्णय देतांना अपीलार्थी यांनी दिलेली माहिती समाधानकारक आहे असा निर्वाळा अपिलीय अधिका-यांनी दिला. मात्र वरिष्ठ पोलीस निरीक्षक खेरवाडी पोलीस ठाणे यांनी अपीलार्थीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या चौकशी अहवालाची प्रत अपीलार्थी यांना द्यावी असे निर्देश दिले. त्यानुसार अपीलार्थीच्या मुळ तक्रार अर्जाप्रकरणी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत अपीलार्थी यांना दि. ६/५/२००९ रोजी देण्यांत आली, अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे आदेश दि. ९/३/२००९ रोजी दिला. हा आदेश प्राप्त होण्यास जरी ७ दिवसांचा अवधी धरला व दि. १६/३/२००९ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना हा आदेश प्राप्त झाला असे गृहित धरले व जरी १ महिन्याच्या आत माहिती देण्याची जरी लिबरल मुभा धरली तरी २० दिवसांचा विलंब निश्चितपणे झालेला आहे. त्यामुळे खेरवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्यावर २० दिवसांच्या विलंबाकरिता २०x२५० =५०००/- इतक्या रक्कमेची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्ती त्यांच्या जून महिन्याच्या पगारातून पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ९ यांनी वसूल करुन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

अंतिमत: जशी रेकॉर्डला माहिती आहे त्याप्रमाणे देण्यात आलेली आहे.

अपीलार्थीची पोलीस चौकशीच्या पध्दतीबद्दल काही तक्रार असेल तर ती त्यांनी वरिष्ठ अधिका-यांना करावी.

***---आदेश---***

**अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.**

**संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ८ मे, २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९८९७/अपील क्रमांक ४२८७/०२

श्री. अन्सारी मेहमुद परवेज -----अपीलार्थी
१९/२३, ३ रा घेलाभाई स्ट्रीट,
मुंबई - ४०० ००८.

विरुध्द

१. शिक्षण उपसंचालक -----उत्तरवादी
मुंबई विभाग यांचे कार्यालय, जवाहर बालभवन,
नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड (पश्चिम)
मुंबई - ४०० ००४.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरीक्षक
मुंबई विभाग यांचे कार्यालय, जवाहर बालभवन,
नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड (पश्चिम)
मुंबई - ४०० ००४.

---विवेचन---

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ८ एप्रिल , २००९
सुनावणीची तारीख ७/५/२००९
अपीलार्थी अनुपस्थित जन माहिती अधिकारी उपस्थित.

श्री. अन्सारी मेहतूद परवेज यांना सन १९८८-८९ व २००८-२००९ या दोन वर्षासाठी बृहन्मुंबईतील शालेय संस्थांची माहिती पाहिजे होती. ही माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे दि. ८/४/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केलेले आहे.

अपीलार्थीचा अर्ज हा उपसंचालक एज्युकेशन यांनी दि. ३ नोव्हेंबर, २००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला व अंतिमतः त्यांना माहिती दि. ६/५/२००९ रोजी

देण्यांत आलेली आहे. विलंबाचे कारण विचारले असता, अपीलार्थीस माहिती समाधानकारक वाटली असल्यामुळे कदाचित अपीलार्थी सुनावणीच्या वेळेस उपस्थित राहिले नसावेत असे सांगितले.

जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यास झालेल्या विलंबाची कारणे विचारली असता २० वर्षापूर्वीची माहिती द्यायची असल्यामुळे ती शोधून द्यायला वेळ लागला असे कारण दिलेले आहे. मात्र इतका उशीर लागण्यासारखे हे कारण पुरेसे वाटत नाही.

जरी शासकीय माहिती अधिका-यांनी भविष्यात परत येणा-या अर्जांवर विहित मुदतीत माहिती पुरविण्याची दक्षता घेण्यात येईल असे लिहून दिले असले तरी अपीलार्थीस हवी असलेली माहिती ही बरीच जुरी होती व ती शोधून द्यायला वेळ लागला या कारणाचा अंशतः विचार करुन पूर्ण शास्ती न लावता जन माहिती अधिका-यांवर अधिनियमाच्या कलम २० अन्वये रु. ५,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्तीची रक्कम शिक्षण उपसंचालक यांनी जन माहिती अधिकारी यांच्या पुढील महिन्याच्या पगारातून वसूल करुन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

***---आदेश---***

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

शिक्षण उपसंचालक यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ८ मे, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९८८०/अपील क्रमांक ४२८९/०२

श्री. विजय के. चौहान -----अपीलार्थी
२ अे, सन अँड सी अपार्टमंटस,
रॉयल लेन जवळ, जुहू तारा रोड,
सांताक्रुज (पश्चिम) मुंबई ४०० ०४९.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ९ -----उत्तरवादी
हिल रोड, बांद्रा (पश्चिम) मुंबई

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड,
बांद्रा (पश्चिम) मुंबई - ४०० ०५०.

---विवेचन---

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ४ एप्रिल , २००९
सुनावणीची तारीख ७/५/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस त्यांच्या २ फेब्रूवारी, २००९ रोजीच्या अर्जानुसार सांताक्रुज पोलीस स्टेशन कडून त्यांनी दि. ३/११/२००८ व दि. २५/९/२००९ रोजी त्यांनी दिलेल्या तक्रारींच्या बाबतीत केलेल्या कारवाईची माहिती पाहिजे होती.

अपीलार्थीस दि. २५/२/२००९ रोजीच्या पत्राने माहिती देण्यात आली. मात्र दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे केलेले प्रथम अपील दि. २३/३/२००९ रोजीच्या आदेशाने

दिलेली माहिती समाधानकारक आहे म्हणून फेटाळण्यात आले.  याविरुध्द सदरचे अपील आहे.

अपीलार्थीस त्यांच्या तक्रारीप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे,  गुन्हयाचा तपास चालू आहे अशी माहिती देण्यात आलेली आहे.  माहितीचा अधिकार अधिनियमाअंतर्गत जन प्राधिकरणाकडे जसे कागदपत्रे असतील त्याप्रमाणे माहिती द्यायची असते व ती माहिती देण्यात आलेली आहे.  तपासाच्या वेगाबद्दल  किंवा तपासाच्या पध्दतीबद्दल कांही तक्रार असल्यास अपीलार्थीनी ती संबंधितांच्या वरिष्ठांकडे करावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक.  ८ मे, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३९८७९/अपील क्रमांक ४२८८/०२**

**श्री. विजय के. चौहान -----अपीलार्थी**
**२ अे, सन अँड सी अपार्टमंटस,**
**रॉयल लेन जवळ, जुहू तारा रोड,**
**सांताक्रुज (पश्चिम) मुंबई ४०० ०४९.**

**विरुध्द**

**१. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ९ -----उत्तरवादी**
**हिल रोड, बांद्रा (पश्चिम) मुंबई**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड,**
**बांद्रा (पश्चिम) मुंबई - ४०० ०५०.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ४ एप्रिल , २००९**
**सुनावणीची तारीख ७/५/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीच्या दि. ७ जानेवारी, २००९ रोजीच्या अधिनियमाच्या कलम ६ खालील अर्जानुसार अपीलार्थीस दि. ३/६/२००८ रोजी जी श्रीयुत मयूर पटेल यांनी केलेल्या फौजरीच्या संदर्भात तक्रार केलेली होती त्यासंबंधी कांही माहिती मागितली होती. या अर्जास दि. १९/१/२००९ अन्वये चौकशी चालू असल्यामुळे अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती अधिनियमाच्या कलम ८(१)(ज) प्रमाणे नाकारण्यात आली होती. याविरुध्द केलेल्या दि. १६ फेब्रूवारी, २००९ रोजी केलेल्या अपीलावर दि. ९/३/२००९ रोजी आदेश देताना मुळ**

अर्जात नमूद केल्याप्रमाणे अपीलार्थी यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक दौलत नगर पोलीस ठाणे मुंबई यांनी माहिती द्यावी असे निर्देश देण्यात आले. त्यानुसार दि. १३/३/२००९ रोजी जन माहिती अधिका-यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना लेखी कळविले व अपील आदेशाची पूर्तता करण्याच्या सूचना दिल्या.

जन माहिती अधिकारी कार्यालयाच्या निर्देशाप्रमाणे दोन टप्प्यात माहिती संबंधित पोलीस स्टेशनने अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ८ मे, २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८७६९/अपील क्रमांक४१४२/०२**

**श्री. अर्जुनमल एम. छाब्रिया -----अपीलार्थी**
**बेले व्हिस्ता, फ्लॅट नं. १५, ३ रा मजला,**
**एस.व्ही. रोड. बांद्रा (पश्चिम) मुंबई ५०**

**विरुध्द**

**१. सहायक मनपा आयुक्त -----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**के/पश्चिम विभाग, अंधेरी (पश्चिम) मुंबई ५८.**
**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इवका)**
**सहायक मनपा आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**के/पश्चिम विभाग, अंधेरी (पश्चिम) मुंबई ५८.**

***---विवेचन---***

अपील क्र. ४१४२/०२ च्या दि. १ एप्रिल, २००९ रोजीच्या आदेशात अपीलार्थी यांना जी छायाचित्रे द्यायची होती ती विहित मुदतीत न दिल्याबद्दल कलम २० अन्वये शास्ती का लादण्यात येवू नये याचा खुलासा मागितला होता. जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे त्यांचा खुलासा सादर केलेला आहे.

उपरोक्त संदर्भित आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का) यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि. ३१/१०/२००८ च्या आदेशानुसार अपीलार्थींना छायाचित्रांच्या प्रती योग्य शुल्क घेवून द्यावयाच्या होत्या. तथापि अपीलार्थींनी शुल्क भरण्यासाठी संपर्क न केल्याने प्रती देण्यात आल्या नाहीत. यासंदर्भात दि. १/४/०९ रोजी मुख्य माहिती आयुक्तांच्या दालनात सुनावणी झाली होती. तद्नुसार जन माहिती

अधिका-यानी दि. ४/४/२००९ च्या पत्रान्वये अपीलार्थीना शुल्क भरुन प्रती देण्यास कळविले होते.

अपीलार्थीनी त्यांच्या दि. २०/४/२००९ च्या पत्रान्वये त्यांच्या प्रतिनिधीस प्रती द्यावयास कळविले होते. त्यानुसार दि. २१/४/०९ रोजी अपीलार्थींचे प्रतिनिधी श्री. अलताफ पठाण यांना फोटो प्रती देण्यात येऊन त्याची पोचपावती घेण्यात आली. तसेच त्यांना न्यायालयीन प्रकरणात वारंवार उच्च न्यायालयात हजर राहावे लागत असल्यामुळे व कार्यालयीन कामाचा व्याप जास्त असल्याने नजरचुकीने माहिती (फोटोप्रती) देण्याबाबत विलंब झालेला आहे. यात त्यांचा हेतुपुरस्सर असा कांहीही स्वार्थ नव्हता, तरी उपरोक्त स्पष्टीकरणाच्या अनुषंगाने व मुख्य माहिती आयुक्तांच्या आदेशाची पूर्तता केली असल्याने माहिती अधिकार अधिनियम कलम २० अन्वये त्यांना शास्ती लावण्यात येवू नये असे त्यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिका-यांनी सादर केलेला खुलासा हा मान्य करण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. १८ मे, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/३६०१३/तक्रार क्रमांक १५९/०२

श्री.शेख मोहम्मद जावेद -----तक्रारदार.
१०१, रुबी टॉवर्स, सहकार रोड,
एस.व्ही.रोड, अल्लाहवाली मस्जिद जवळ,
जोगेश्वरी (पश्चिम) मुंबई - ४०० १०२.

विरुध्द

१. अतिरिक्त आयुक्त -----उत्तरवादी
विक्रीकर आयुक्तांचे कार्यालय,
विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई ४०० ०१०.

२.जन माहिती अधिकारी तथा विक्रीकर उपायुक्त
विक्रीकर आयुक्तांचे कार्यालय,
विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१०.

*---विवेचन---*

राज्य माहिती आयुक्त,बृहन्मुंबई यांनी अपील क्र. ५१६ मध्ये पुढीलप्रमाणे आदेश दिले होते.

"विक्रीकर कार्यालयाने दिनांक ११/२/२००४ च्या आदेशान्वये अनुज्ञेय नसलेल्या खर्चाची गणना करुन वित्त विभागाने अपीलकारास दि. २८/८/२००३ च्या आदेशान्वये मंजूर केलेल्या वैद्यकीय खर्चाच्या रु. ८८,८७५/- इतक्या रकमेपैकी रु. ७५,१७०/- इतकी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर केली. कोणत्या बाबीवरील खर्च अपीलकारास अनुज्ञेय नाही, त्यामुळे रुपये १३,७०५/- इतकी रक्कम वजा केली यासंबंधी बाबनिहाय माहिती अपीलकारास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तरी या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपीलकारास जन माहिती अधिका-याना माहिती उपलब्ध करुन द्यावी. "

या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही असे मत नमूद करुन तक्रारदारांनी आयोगाकडे दि. १५ ऑक्टोबर, २००८ रोजी तक्रार केली होती. या तक्रारीची सुनावणी दि. १८ मे, २००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळेला पुढीलप्रमाणे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी दिलेले आहे.

"वरील आदेशानुसार श्री. शेख हयांना माहिती अधिकारी, विक्रीकर आयुक्त कार्यालय, मुंबई हयांना या कार्यालयाच्या पत्र क्र.ब-३४३ दि. ३०/८/०८ नुसार अर्जदारास पृष्ठ १ ते १६९ मध्ये रुमग्र माहिती, खर्चाची बाबनिहाय परित्रयना स्पष्ट करुन दिली होती. त्यांच्या खर्चाच्या परिपूर्ती संपूर्ण धारणीची प्रत त्यांना पुरविण्यात आली. त्यामुळे पुढील परिगणना स्पष्ट करण्यात आली आहे.

श्री.शेख हयांना कार्यालय अधिकारी, वित्त विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई हयांच्या आदेश क्र. २८ ऑगस्ट ०३ नुसार श्री.शेख हयांना झालेल्या एकूण रु. ०१,०३,५८३/- इतक्या खर्चापैकी रु. ८८,८७५/- इतक्या रक्कमेवर आदेयातील परिच्छेद ३ मध्ये म्हटल्याप्रमाणे आरोग्य विभागाच्या २९/०७/०९ च्या निर्णयामध्ये तरतुदीनुसार खर्चाच्या रक्कमेची परिगणना करण्याची दक्षता घेवून एकूण रु. ७५,१७०/- इतक्या रक्कमेची मंजूरी देण्यात आली. सदर परिगणना खालीलप्रमाणे करण्यात आली.

१) रुग्णालयातील वास्तव्याचा खर्च

अ- दि. १३/०७/९९ ( ४ दिवस), रु. ७५०/- प्रमाणे ७५० ४:: ३०००

प्रत्यक्ष खर्चाच्या ६५% १९५०

(बाथरुमसह स्वयंमकक्ष)

ब- दि.१७/७/९९ ते २०/७/९९ (३ दिवस)

रु. ३००० प्रमाणे ३००० ३ :: ९०००

प्रत्यक्ष खर्चाच्या ५०%

अतिदक्षता कक्ष (आयसीसीयू )- --------४५००

एकूण (अ)रु.६४५०/-

२)  औषधोपचार दिवस खर्च रु.  ७६,८७५/-

अनुदेय नसलेल्या खर्च   रु.        ५२०/-

---------------------

रु. ७६,३५५/-

एकूण अनुदेय (प्रत्यक्ष खर्चाच्या रु. ७६,४५५/-) ९०%  :: (ब)६८७२०/-

एकूण  अ. ब  : :  ७५,१७०/-

वरील प्रमाणे केलेली स्वयस्पष्ट परिगणना अर्जदारास यापूर्वी कळविण्यात आली होती.

माहिती अधिकाराखाली  माहिती या व्याख्येप्रमाणे सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने संपूर्ण धारणीची प्रत कि ज्यामध्ये उपरोक्त परिगणना उपलब्ध आहे ती पुरविण्यात आली आहे.   तसेच या धारिणीमध्ये किंवा माहितीबद्दल शंका असल्यास त्यांनी संबंधित अधिकारी  मा. अप्पर विक्रीकर आयुक्त यांच्याशी संपर्क साधावा असेहि कळविले होते.   तसेच मा. अप्पर विक्रीकर आयुक्त यांनाही त्या पत्राची प्रत देवून अर्जदाराच्या काही शंका असल्यास त्या दूर करण्याबाबत विनंती केली आहे.   "

वरील निवेदनावरुन  असे स्पष्ट होते की,  रेकॉर्डला असलेली सर्व माहिती तक्रारदारांस देण्यांत आलेली आहे व तक्रारदारांस मदत करण्याच्या दृष्टीने अतिरिक्त विक्रीकर आयुक्त  यांच्याशी सुध्दा चर्चा करण्यास त्यांना मुभा आहे असेहि सांगण्यांत आलेले आहे.

तक्रारदार हे त्याच विभागातील आता सेवानिवृत्त झालेले कर्मचारी आहेत.

रेकॉर्डप्रमाणे असलेली सर्व माहिती देण्यात आलेली आहे व तक्रारदारांची जर कांही शंका किंवा प्रश्न असतील तर त्याचा उच्च स्तरिय विचार होवू शकेल असेहि आश्वासन जन माहिती अधिकारी यांनी दिलेले आहे.   त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. १८ मे, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/३५०२७ तक्रार क्रमांक ६५/०१

डॉ.श्री. अखलक हुसेन -----तक्रारदार.
सी-२८३, मोहमदीया चाळ,
क्षमा को.ऑप.हौसिंग लि., पी.के.नगर,
धारावी, मुंबई - ४०० ०१७.

विरुध्द

१. अप्पर जिल्हाधिकारी -----उत्तरवादी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक सहकारी संस्था
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.

*---विवेचन---*

डॉ. अखलक हुसेन यांनी दि. २२ सप्टेंबर, २००८ रोजी जी तक्रार केली होती त्याची सुनावणी दि. १८ मे, २००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

तक्रारदारांना शमा को.ऑप.हौसिंग सोसायटी, धारावी या संस्थेबद्दलची माहिती पाहिजे होती, व त्यासंबंधात सर्व कागदपत्रे दाखविण्याची तयारी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविली होती व त्याप्रमाणे तक्रारदारांनी नस्तीची पाहणी सुध्दा केलेली आहे. पण त्यांना जी कागदपत्रे हवी आहेत ती त्या नस्तीत नाहीत. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार सन

२००३ साली  सहायक निबंधक यांनी एक सभा बोलाविली होती त्या सभेमध्ये एक रोजनामा तयार केलेला होत असे तक्रारदारांचे म्हणणे आहे.   पण या बैठकीचे कुठचेहि कागदपत्र नस्तीमध्ये नाहीत.    त्यानंतर जवळपास  २ ते  ३ सहायक निबंधक बदलून गेले असेहि सांगण्यात आले.  तेव्हा तक्रारदारांनी त्यांच्याकडे असलेली मिटींगची निमंत्रणाची प्रत जन माहिती अधिकारी यांना द्यावी व त्यावरुन  पुन्हा एकदा कागदपत्रांचा शोध सहायक निबंधक यांनी घ्यावा व तक्रारदारास पाहिजे असलेली कागदपत्रे देण्याचा त्यांनी प्रयत्न करावा.

सोसायटीच्या  पुनर्विकास प्रकल्पात हायकोर्टाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे  मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी या प्रकल्पाच्या यशस्वितेच्या दृष्टीनेहि ि द. २३  डिसेंबर, २००८ रोजी कांही आदेश पारित केलेले आहेत त्याची माहिती तक्रारदारांकडे आहेच.   तेव्हा संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

***---आदेश---***

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक.  १८ मे, २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/३९७११ तक्रार क्रमांक-३२९/०१

श्री. जयंतीलाल वोरा -----तक्रारदार
ब्लॉक नं.४, २ रा मजला, मेघदूत इमारत,
२८३, फ्लॅन्क रोड, किकाभाई इस्पितळासमोर,
गांधी मार्केट जवळ, किंग्ज सर्कल, सायन (पूर्व)
मुंबई - ४०० ०२२.

विरुध्द

१. प्रादेशिक परिवहन अधिकारी -----उत्तरवादी
प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई

२.जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
बी २, ३ रा मजला, वडाळा ट्रक टर्मिनल,
वडाळा, मुंबई - ४०० ०३७.

<u>*---विवेचन---*</u>

श्रीयुत जयंतीलाल वोरा यांनी श्रीयुत प्रकाश निकम यांच्या वतीने आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई पूर्व विभाग यांच्याकडून श्रीयुत प्रकाश निकम यांनी श्रीयुत तायडे यांना जो ऑटोरिक्षाचा परवाना हस्तांतरित केला होता त्यासंदर्भातील माहिती देण्यात आलेली नाही.

सदर तक्रारीची सुनावणी दि. १९ मे, २००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस तक्रारदार, जन माहिती अधिकारी तसेच अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अर्जदार श्रीयुत प्रकाश निकम यांचा माहितीचा अधिकार अधिनियमातील अर्ज हा दि. २०/१२/२००८ रोजीचा होता व तो स्वत: श्रीयुत प्रकाश निकम यांनी केलेला होता. त्यांना ५ जानेवारी, २००९ रोजी उत्तर देण्यात आले व त्यात त्यांच्या विरुध्द असलेल्या तक्रारीमुळे हे

प्रकरण प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे निर्णय घेण्यासाठी प्रलंबित आहे अशी माहिती देण्यांत आली.

सुनावणीच्या वेळेला असेहि सांगण्यांत आले की, प्रादेशिक परिवहन प्राधिकरणात श्रीयुत प्रकाश निकम यांनी श्रीयुत तायडे यांना करारनाम्यावर आपला परवाना हस्तांतरित करण्याची कृति ही बेकायदेशीर असल्यामुळे त्यांचा परवाना हा रद्द करण्यात आलेला आहे, व तसे त्यांना दि. ७ मे, २००९ रोजीच्या पत्राने कळविण्यांत आलेले आहे. त्यामुळे माहिती मुदतीत देण्याच्या बाबतीत जन माहिती अधिका-यांकडून कुठचाहि कसूर झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. १९ मे, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८३८८/अपील क्रमांक ४३२९/०२**

**श्री. सखाराम अनंत मालाडकर -----अपीलार्थी**
**अेचआयजी १/१ , कोंकण हौ.बोर्ड कॉलनी,**
**कल्याण (पश्चिम) बिर्ला कॉलेजसमोर, जि. ठाणे.**

**विरुध्द**

**१. सहायक संचालक -----उत्तरवादी**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,**
**४९, खेरवाडी ,अलियावर जंग मार्ग,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई - ५१ .**

**२.जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,**
**४९, खेरवाडी ,अलियावर जंग मार्ग,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई - ५१ .**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २३ जानेवारी , २००९**
**सुनावणीची तारीख १९/५/२००९**
**अपीलार्थी अनुपस्थित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**शिल्प निदेशक या पदासाठी अपीलार्थी उमेदवार होते व लेखी , प्रॅक्टीकल व मुलाखतीसाठी त्यांना बोलाविण्यात आले होते व त्यांची निवड न झाल्यामुळे त्यांनी या निवडीच्या संदर्भात दि. ५/११/२००८ रोजीच्या अर्जाने कांही माहिती विचारली होती. ही माहिती अपीलार्थीस दि. ५/१२/२००८ रोजीच्या पत्राने देण्यात आली. तसेच अपिलीय आदेशान्वये संबंधित शासन निर्णयाच्या प्रती सुध्दा त्यांना देण्यांत आलेल्या आहेत.**

अपीलार्थीचा मुळ अर्ज व अपील यात उपस्थित केलेल्या सर्व मुद्दयांची माहिती अपीलार्थीना देण्यांत आलेली आहे असेच आयोगाचे मत आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. १९ मे, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८२५२/अपील क्रमांक ४३३६/०२**

**श्री. प्रकाश शंकरराव साळवी -----अपीलार्थी**
**रुम नं. ८१२, विक्रीकर भवन, बी.एस.धोडी मार्ग,**
**माझगांव, मुंबई -- ४०० ०१०**

**विरुध्द**

**१. उप सचिव (वि.प्र.१) -----उत्तरवादी**
**वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.**

**२.जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (वि.प्र.१)**
**वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.**

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ३१ जानेवारी , २००९
सुनावणीची तारीख २०/५/२००९
अपीलार्थी अनुपस्थित जन माहिती अधिकारी व उपस्थित.

अपीलार्थीनी अनुपस्थितीची जरी कारणे दिलेली असली तरी आयोगाकडे प्रलंबित असलेल्या प्रचंड अपीलांची संख्या लक्षात घेता शक्यतोवर सुनावणी पुढे ढकलण्यात येवू नये असे आयोगाचे धोरण असल्यामुळे अपीलार्थीचा अपीलमेमो विचारात घेण्यांत आला व जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले.

जन माहिती अधिका-यांनी अपीलातील मुद्दयांवर त्यांचा खुलासा पुढीलप्रमाणे सादर केलेला आहे.

"१. अपीलार्थी श्री. साळवी यांनी सन २००७-०८ च्या अपर विक्रीकर आयुक्त पदावर पदोन्नतीच्या निवड प्रक्रियेची संपूर्ण नस्तीच्या झेरॉक्स प्रती मागितलेल्या होत्या. त्यामध्ये Proccding Sheets, Noting Remarks] decision, G.R s प्राप्त अर्ज इ. मिळावे असे त्यांनी नमूद केले आहे. त्यानुसार त्यांना संपूर्ण नस्तीच्या पृ. १ ते ८ टिप्पणी विभाग व पृ.१ ते ९७ पत्रव्यवहार विभाग अशा एकूण १०५ प्रती उपलब्ध करुन दिल्या आहेत.

२. संपूर्ण नस्तीच्या झेरॉक्स प्रतींची मागणी केली असल्यामुळे नस्तीवरील उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या आहेत.

३ व ४ प्रथम अपील अधिकारी यांचेकडे दि. १२/८/०८ रोजी सुनावणी झाली व त्यांचा निर्णय दि. १४/८/०८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. तथापि अपीलार्थीनी दि. १८/११/०८ च्या पत्रान्वये अपीलावरील निर्णय आपणास प्राप्त झालेला नसल्याचे कळविल्यामुळे दि. २६/११/०८ च्या शासन पत्रान्वये सदर निर्णयाची प्रत त्यांना Speed Post द्वारे पुन्हा पाठविण्यात आली.

५. प्रथम सुनावणीच्या वेळी सर्व कागदपत्रे मिळालेली नसूनी अपूरी कागदपत्रे मिळाली असल्याचे अपीलार्थीनी सांगितले. नेमकी कोणती कागदपत्रे अपूरी मिळाली आहेत त्यासंबंधीचा उल्लेख अपीलार्थीनी केला नाही तर मी केलेली मागणी काळजीपूर्वक वाचा म्हणजे कोणती कागदपत्रे मिळाली नाहीत हे लक्षात येईल असे त्यांनी सांगितले. तसेच कागदपत्रे उशिरा मिळाल्याचा देखिल उल्लेख केला. परंतु हा मुद्दा पुढे त्यांनी सोडून दिला याबाबतीत जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेतले. सन २००७-०८ या वर्षामध्ये विक्रीकर आयुक्त पदी पदोन्नतीसाठी तयार केलेल्या नस्तीवरील सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्या असल्याची बाब त्यांनी निदर्शनास आणली. तसेच सर्व कागदपत्रांसाठी आवश्यक रक्कमेचा भरणा करण्याविषयी अपीलार्थीस विहित मुदतीत कळविले असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. अपीलार्थीनी माहितीच्या अधिकारात मागणी केलेली सर्व कागदपत्रे त्यांना दिली असल्याचे उपलब्ध नस्तीवरुन दिसून येते.

६. अ. संपूर्ण नस्ती झेरॉक्स दिली आहे.

ब. Proceeding Sheets म्हणजे निर्देश पत्र असे अभिप्रेत असल्यास

त्याची प्रत दिलेली नाही. ती देण्यात यावी.

क. टिप्पणी विभागातील सर्वच्या सर्व पृ. १ ते ८/ टि उपलब्ध करुन दिलेली आहे.

ड/ई या प्रकरणात सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय त्यांनसार वित्त विभागाचे अभिप्राय, विभागाचा प्रस्ताव व त्यावर प्रधान सचिव (वित्त) मा.मंत्री (वित्त), मा. मुख्यमंत्री यांचे स्तरावरुन झालेला निर्णय यांची नोंद असलेली टिप्पणी विभागाच्या प्रती अपीलार्थीस देण्यात आलेल्या आहेत.

फ. नस्तीवर उपलब्ध असलेल्या शासन निर्णय परिपत्रक इ. च्या प्रती देण्यात आल्या आहेत.

ग. सदर नस्तीवर अपीलार्थी व्यतिरिक्त अन्य व्यक्ती/अधिकारी यांचे अर्ज नाहीत.

ह. पुरविण्यात आलेल्या माहिती व्यतिरिक्त अन्य माहिती नस्तीवर नाही.

७. ज्या कागदपत्रांवर माहिती आहे तेवढयाच १०५ कागदपत्रांबाबत फी आकारलेली आहे. ज्या कागदपत्राची मागची बाजू कोरी आहे त्याची फी आकारलेली नाही.

८ते १५. संपूर्ण नस्तीच्या झेरॉक्स प्रती मागितल्या असल्यामुळे सदर नस्तीवरील सर्व कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन दिल्या आहेत.

१६. अपीलार्थीनी नमूद केलेले पृ.८१ /प वरील कागदपत्रे ही वित्त विभागाचे शासन परिपत्रक दि. ७ सप्टेंबर, २००२ चे पृष्ठ आहे. सदर परिपत्रकाची स्वच्छ प्रत त्यांना उपलब्ध करुन देता येईल.

१७ ते १८ सदर दि. ७ सप्टेंबर, २००२ च्या परिपत्रकान्वये विक्रीकर विभागातील सहायक विक्रीकर आयुक्त संवर्गाची दि. १/१/९२ पर्यंतची स्थिती दर्शविणारी तात्पुरती जेष्ठता सूचीच्या नस्तीमध्ये दोन प्रती उपलब्ध आहेत. अपीलार्थीनी संपूर्ण नस्तीची झेरॉक्स प्रत मागितली असल्यामुळे सर्व कागदपत्रे त्यांना उपलब्ध करुन दिली आहेत.

१९. नस्तीवर सदरहू कागदपत्रांचे दोन संच आहेत. सर्व कागदपत्रांची मागणी केली असल्यामुळे नस्तीवरील सर्व प्रती उपलब्ध करुन दिल्या आहेत.

२०. नस्तीवर जशी कागदपत्रे उपलब्ध होती तशी सर्व कागदपत्रे अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

२१/२२ अपीलार्थीचा आरोप निराधार आहे. सन २००७-०८ च्या अपर विक्रीकर आयुक्त पदावरील पदोन्नतीच्या नस्तीवरील संपूर्ण कागदपत्रे देण्यात आली आहेत.

२३. प्रोसिडींग शिट म्हणजे निर्देश पत्र अपेक्षित असावे. सदर निर्देशपत्राची प्रत अपीलार्थीस दिलेली नाही. त्याची प्रत देता येईल. अपीलार्थीनी नमूद केल्याप्रमाणे या नोंदी प्रकरण नोंदवहीवर घेतल्या जातात . आवश्यक असल्याची त्याची प्रत उपलब्ध करुन देता येईल.

कार्यपध्दतीप्रमाणे नस्तीची आवक जावक प्रचलित नोंदही DJMS द्वारे घेतली जाते.

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की, अपीलार्थीस नोटींगशिट सकट सर्व नस्तीची प्रत देण्यांत आलेली आहे. ज्या प्रती अस्पष्ट देण्यांत आलेल्या आहेत त्या परिपत्रकाच्या स्वच्छ प्रती तसेच निर्देशपत्राची प्रत सुध्दा अपीलार्थीस पाठवून देण्याचे जन माहिती अधिका-यांनी नमूद केलेले आहे. त्याप्रमाणे त्यांनी कार्यवाही करावी.

माहिती देण्याच्या बाबतीत कुचराई झालेली दिसून येत नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
जन माहिती अधिका-यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २० मे, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३८८८५/अपील क्रमांक ४३३७/०२

श्री. कारभारी लहानू गर्जे -----अपीलार्थी
गौरीपुत्र, १४४/४३१८ तळमजला,
कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व) मुंबई ८३.

विरुध्द

१. शिक्षण निरीक्षक -----उत्तरवादी
बृहन्मुंबई उत्तर विभाग,
नवीन प्रशासकीय भवन, २ रा मजला,
रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पूर्व) मुंबई - ७१.

२.जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
सावित्रीबाई फुले विद्यालय (माध्यमिक)
द्वारा- श्रेष्ठ क्लासेस, रमाबाई आंबेडकर नगर,
घाटकोपर (पूर्व) मुंबई - ४०० ०७५.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २० फेब्रूवारी , २००९
सुनावणीची तारीख २०/५/२००९
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी उपस्थित.
शाळेचे मुख्याध्यापक, सावित्रीबाई फुले विद्यालय हे उन्हाळी सुट्टी असल्यामुळे उपस्थित राहू शकले नाहीत असे अपिलीय अधिकारी यांनी सांगितले.

अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला असे स्पष्ट झाले की, अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई उत्तर विभाग यांनी त्यांच्या दि. २३/१/२००९ रोजीच्या आदेशाने जन माहिती अधिकारी यांना अपीलार्थीस हवी असणारी माहिती देण्याचे आदेश याआधीच

दिलेले आहेत. अपीलार्थींनी मागितलेली माहिती बरीच विस्तृत प्रमाणात आहे. तेव्हा अपिलीय अधिका-यांनी शाळेच्या सुट्टया संपताच जन माहिती अधिका-यांकडून त्यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करुन घेण्याची जबाबदारी पार पाडावी असे निर्देश देण्यात आले.

तसेच जन माहिती अधिकारी यांनी आतापर्यंत अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे अपीलार्थीस माहिती देण्याची कार्यवाही केली नाही याबद्दल त्यांचेवर अधिनियमाच्या कलम २० अन्वये कारवाई कां करण्यात येऊ नये याबाबतचा त्यांचा खुलासा दि. ३० जून, २००९ रोजी आयोगास प्रत्यक्ष येऊन सादर करावा.

---*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २० मे, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९८८५/अपील क्रमांक ४३३९/०२

श्री. अनंत चिमणलाल भट -----अपीलार्थी
३/९ कल्पना, तळमजला, एन.एस. रोड नं.५,
हटकेश सोसायटी, जे.व्ही.पी.डी.स्कीम,
पार्ले (पश्चिम) मुंबई - ४०० ०५६.

विरुध्द

१. जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था (३) -----उत्तरवादी
गृहनिर्माण भवन, तळमजला,
वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.

२.जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था
के पश्चिम विभाग
गृहनिर्माण भवन, तळमजला,
वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १५ एप्रिल , २००९
सुनावणीची तारीख २०/५/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी हटकेश को.ऑप.हौसिंग सोसायटी विलेपार्ले येथील फ्लॅट क्र.९ च्या बाबतीत व इतर कांही माहिती पाहिजे होती. जिल्हा उपनिबंधकांनी ही माहिती संस्था स्तरावरील आहे त्यामुळे ती माहिती संस्थेकडूनच घेता येऊ शकेल असे म्हटले. मात्र संस्थेचे असे म्हणणे आहे की, सहकारी गृहनिर्माण संस्था या माहितीचा अधिकार

अधिनियम या कायद्याप्रमाणे "जन प्राधिकरण" नाहीत. त्यामुळे त्यांचेवर सदस्य सोडता इतरांना त्यांच्या संस्थेची माहिती देणे बंधनकारक नाही.

असे दिसते की, सोसायटीतील एका फ्लॅटच्या बाबतीत वारसा हक्क / मृत्युपत्राद्वारे अपीलकर्त्यांच्या नातेवाईकाच्या वाटयाला त्या सोसायटीचे सदस्यत्व दिलेले आहे. व त्याबद्दल त्यांचा व अपीलकर्त्यांचा वाद आहे व तो वाद कोर्टात चालू आहे. त्यामुळे संस्थेच्या रेकॉर्डला सदस्य म्हणून अपीलकर्त्यांचे नांव नाही.

नुकताच मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने तसेच त्याअगोदर कर्नाटक हायकोर्टाने सहकारी संस्था या माहितीचा अधिकार अधिनियमाप्रमाणे जन प्राधिकरण नाहीत अशाच प्रकारचा निर्णय दिलेला आहे.

माहिती संस्थास्तरावरील आहे त्यामुळे ती संस्थेकडूनच घ्यावी लागेल व संस्था ही जन प्राधिकरण नसल्यामुळे व त्यांना ही माहिती गैर सभासदांना उपलब्ध करुन देण्यास नकार दिलेला आहे. जर अपीलकर्ते हे त्या संस्थेचे सदस्य असते तर निश्चितपणे सहकार विभागाच्या अधिका-यांना त्या संस्थेस सदरील माहिती अपीलार्थीस देण्यास भाग पाडले असते. पण तशी परिस्थिती नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश ---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २० मे, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९८७१/अपील क्रमांक ४३४१/०२

श्री. संतोष अनंत पवार -----अपीलार्थी
३/९, श्री वरदविनायक वेलफेअर सोसायटी,
श्री संकल्पपूर्ती मंदिराजवळ, तानाजी नगर,
कुरार गांव, मालाड (पूर्व) मुंबई - ४०० ०९७.

विरुध्द

१. सहायक आयुक्त -----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,
लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम) मुंबई - ४०००६४

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (ई.व.का)
बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,
लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम) मुंबई - ४०००६४

३. जन माहिती अधिकारी तथा व निरिक्षक (अनुज्ञापन)
बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,
लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम) मुंबई - ४०००६४

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १५ एप्रिल , २००९
सुनावणीची तारीख २०/५/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींचे जे तीन मुद्दे आहेत त्यात माहितीपेक्षा कृति व्हावी असे दर्शविणारे हे अपील आहे.

मोबाईल टॉवरच्या बाबतीत संबंधित अपिलीय अधिका-यांनी निर्देश दिल्याप्रमाणे मोबाईल टॉवर डिमॉलिश करण्याची कारवाई झालेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व त्यासंबंधी रजिस्टरला असलेली नोंद सुध्दा आयोगास दाखविण्यात आली.

मालाड पूर्व वार्ड क्र. ३४ , तानाजी नगर मधील लाईट खांबा क्र. PCI 24/005 या भोवती अनधिक.त पावसाळी छपरी सहायक अभियंता (इ.व.का) पी/उत्तर विभागाच्या कार्यालयाकडून पोलीस बंदोबस्त मिळवून हटविण्यात येईल असे अपीलार्थीस कळविण्यात आले आहे. व मनसेच्या बोर्डाच्या बाबतीत पुढीलप्रमाणे निवेदन सादर केलेले आहे.

"दिनांक २२/१/०९ रोजी उपशाखाप्रमुख वार्ड क्र. ३४ मनसे पक्ष यांनी सदर बोर्डाला (नामफलकासाठी ) खाजगी जागेचे पुरावे सादर करुन व सहायक अभियंता (परिरक्षण) पी/उत्तर हयांचे हा नामफलक महापालिकेच्या जागेवर नसल्याचा अभिप्राय घेऊन सदर नामफलकास दि. १/४/०८ पासून महापालिकेच्या नियमाप्रमाणे शुल्क घेऊन दि. १८/५/२०१० पर्यंत रु. ५३४६/- शुल्क स्वीकारुन परवाना क्र. ०७६१२२४०८४ देण्यांत आला आहे व दि. १९/५/०९ रोजी संतोष पवार हयांना कळविण्यात आले आहे. "

अशा रितीने अपीलार्थीच्या तिन्ही मुद्दयांच्या बाबतीत माहिती अपीलार्थीस पुरविण्यात आलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २० मे, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९८८७/अपील क्रमांक ४३४०/०२

श्री. रमेश अेम शहा -----अपीलार्थी
३/सी जयहिंद इस्टेट, २ रा मजला,
रुम नं. १२, अे.अेम. रोड. भुलेश्वर, मुंबई - २

विरुध्द

१. सहायक आयुक्त -----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग कार्यालय,
७६, श्रीकांत पालकर मार्ग, चंदनवाडी,
मरिन लाईन्स (पूर्व) मुंबई ४०० ००२.

२.जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन)
बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग कार्यालय,
७६, श्रीकांत पालकर मार्ग, चंदनवाडी,
मरिन लाईन्स (पूर्व) मुंबई ४०० ००२.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १५ एप्रिल , २००९
सुनावणीची तारीख २०/५/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस जी माहिती पाहिजे होती त्यात पुढील मुद्दे आहेत.

१. दि.१०/१२/२००३ रोजी सहायक आयुक्त "सी" विभाग यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक , लोकमान्य टिळक रोड पोलीस ठाणे यांना पाठविलेल्या पत्राची प्रत अपीलार्थीस मिळालेली आहे.

२.	कलम ३९४ ची कारवाई याबाबत दि. २७ जानेवारी, २००९ रोजीच्या पत्राने स्थिती व झालेला दंड याची माहिती देण्यांत आलेली आहे.

३.	अपीलार्थींच्या म्हणण्यानुसार रहिवासी बिल्डींगमध्ये कारखान्याला परवानगी कशी देण्यात आली १

अपीलार्थींना ते सन २००३ पासून त्याबाबत तक्रार करीत आहेत परंतु त्याबाबत का कारवाई झाली नाही ही माहिती पाहिजे आहे.

यासंबंधीची जी माहिती दिलेली आहे ती अद्ययावत नाही असे अपीलार्थींचे म्हणणे आहे. दिलेली माहिती अर्जाच्या वेळच्या स्थितीची देण्यात आली आहे असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तेव्हा याबाबत सद्य:स्थितीची माहिती अपीलार्थीस देण्यांत यावी असे जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यांत आले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*--आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २१ मे, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/४०४५७/तक्रार क्रमांक ३६१/०२

श्री.रविकिरण श्री. हलदीपूर -----तक्रारदार.
११९ ए, १ ला मजला, शहिद भगतसिंग को.ऑप
हौसिंग सोसायटी, जे.बी. नगर. अंधेरी (पूर्व)
मुंबई - ४०० ०५९.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त (परि ९) -----उत्तरवादी
पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड,
बांद्रा (पश्चिम) मुंबई - ४०० ०५०.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड,
बांद्रा (पश्चिम) मुंबई - ४०० ०५०.

*---विवेचन---*

दि. २९ एप्रिल, २००९ रोजी श्रीयुत रविकिरण हलदीपूर यांनी आयोगाकडे अशी तक्रार केलेली आहे की, आयोगाने दिलेल्या अपील क्र. २५५८/०२ मधील आदेशाचे पालन जन माहिती अधिकारी (परि ९) पश्चिम नियंत्रण कक्ष यांच्याकडून झालेले नाही.

या तक्रारीची सुनावणी दि. २० मे, २००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळला तक्रारकर्ते अनुपस्थित. जन माहिती अधिकारी उपस्थित.

यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा सादर केलेला आहे.

" अपीलार्थी श्री रविकिरण हळदीपूर यांच्या प्रथम अपील अर्जावरुन पोलीस उप आयुक्त परिमंडळ ९ व अपिलीय अधिकारी, बांद्रा पश्चिम मुंबई यांच्या कार्यालयात झालेल्या सुनावणीनुसार दिलेल्या जा.क्र. ५८३/पोउआ/परि ९/माअअ/०७ दि. ३/४/२००७ रोजीच्या

आदेशानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंधेरी पोलीस ठाणे यांनी अपीलार्थी श्री. रविकिरण हळदीपूर यांना जा.क्र.४६९७/सपोनि/अंधेरी पो.ठाणे/०७ दि. १९/५/०७ अन्वये माहिती (चौकशी कागदपत्रांच्ऱ्या ३२५ प्रती) दिलेली असून त्याबाबत अपीलार्थी श्री. रविकिरण हळदीपूर यांनी पोच म्हणून दिनांकित स्वाक्षरी केलेली आहे.

परंतु तत्पूर्वी अपीलार्थी श्री रविकिरण हळदीपूर यांनी द्वितीय अपील आयोगाकडे सादर केलेले होते व त्या अर्जाबाबत आयोगाकडे सुनावणी होवून त्यात झालेल्या आदेशानुसार (अपीलार्थींना माहिती देण्याबाबत) जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अंधेरी पोलीस ठाणे यांना पत्र पाठवून सदर आदेशानुसार माहिती जन माहिती अधिकारी कार्यालयास सादर करण्याबाबत कळविले होते. त्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंधेरी पोलीस ठाणे ,मुंबई यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास जा.क्र. १४७३/वपोनि/अंधेरी पो.ठाणे/०९ दि. १७/२/२००९ अन्वये असे कळविले आहे की, अपीलार्थी यांना हवी असलेली माहिती यापूर्वीच म्हणजेच दि. १९/५/२००७ रोजी दिली आहे. पण ती प्रमाणित नसल्याचे अपीलार्थींचे म्हणणे आहे. परंतु त्यांना हव्या अशा प्रमाणित प्रती उपलब्ध करुन देण्यासाठी मुळ कागदपत्र अंधेरी पोलीस ठाणे येथे सध्या नसून ते कागदपत्र मा. महानगर दंडाधिकारी रेल्वे मोबाईल न्यायालय, अंधेरी (पूर्व) मुंबई यांचे न्यायालयात आहेत. सबब वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंधेरी पोलीस ठाणे मुंबई यांनी नमूद न्यायालयास अंधेरी पोलीस ठाणे, जा.क्र.१४६७/०९ दि. १७/२/०९ प्रमाणे अहवालाद्वारे कागदपत्रांची मागणी केलेली आहे. तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अंधेरी पोलीस ठाणे यांनी त्यांच्या जा.क्र. ४३०६:०९ दि. १४/५/०९ अन्वये जन माहिती अधिकारी कार्यालयास असे कळविले आहे की, त्यांनी जा.क्र.२३४१/०९, दि. १७/३/०९ , जा.क्र. २५६७/०९ दि. २५/३/०९, जा.क्र.४२२३/०९ दि. १२/५/०९ असे तीन विनंती पत्र मा. महानगर न्यायदंडाधिकारी , रेल्वेमोबाईल न्यायालय, अंधेरी पूर्व मुंबई यांना देण्यात आलेली आहे. परंतु मा. न्यायालयाकडून अद्यापपर्यंत सदर गुन्हयाची कागदपत्रे प्राप्त झालेली नाहीत. तरी सदरची कागदपत्रे ही पोलीस ठाण्याच्या अभिलेखावर उपलब्ध नसल्याने अपीलार्थीस ती प्राप्त करुन देण्यास अडचण येत आहे असे नमूद पत्रात कळविले आहे.

अपीलार्थी यांना अंधेरी पोलीस ठाणे कडून त्यांनी मागणी केलेली माहिती यापूर्वीच दि. १९/५/०७ रोजी देण्यात आलेली आहे. परंतु सदर माहितीच्या प्रती प्रमाणित नसलेबाबत अपीलार्थीचे म्हणणे होते. दरम्यान सदर माहितीची कागदपत्रे मा. दंडाधिकारी, रेल्वे मोबाईल न्यायालय, अंधेरी पूर्व मुंबई येथे सादर करण्यात आली होती. अपीलार्थीस माहिती मिळणेकरीता जन माहिती अधिकारी कार्यालयाने अंधेरी पोलीस ठाण्यास व अंधेरी पोलीस ठाण्याने मा. न्यायालयास वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. परंतु मा. न्यायालयाकडून अद्याप कागदपत्रे प्राप्त न झाल्याने अपीलार्थींना माहिती देण्यास अडचण येत आहे.

सदरची माहिती मा. न्यायालयाकडून प्राप्त होताच अपीलार्थींना त्वरित देण्याची तजविज ठेवली आहे. "

उपरोक्त खुलास मान्य करण्यात येत आहे. मात्र मा.दंडाधिकारी रेल्वे मोबाईल न्यायालय यांच्याकडे जारीने पाठपुरावा करुन तक्रारदारास हवी असणारी माहिती प्रमाणित करुन द्यावी.

***---आदेश---***

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. २१ मे, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ४३५२/०२

श्री. चेतन कोठारी -----अपीलार्थी
५२ ओशियानिक अपार्टमेंट,
डॉ. राजबली पटेल लेन, बी. देसाई रोड,
मुंबई - ४०० ०२६.

विरुध्द

१. मुख्य आरोग्य अधिकारी -----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
३ रा मजला, एफ/ दक्षिण वार्ड,
जगन्नाथ भातणकर मार्ग, परेल नाका,
मुंबई - ४०० ०१२.

२.जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी आरोग्य अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
३ रा मजला, एफ/ दक्षिण वार्ड,
जगन्नाथ भातणकर मार्ग, परेल नाका,
मुंबई - ४०० ०१२.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २० डिसेंबर, २००८
सुनावणीची तारीख २१/५/२००९
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपीलार्थीस दि. २३/१/२००९ रोजी आवश्यक ती माहिती देण्यांत आलेली आहे. अपीलार्थीस नायर हॉस्पीटलमधील पोस्टमार्टेम व बेवारस प्रेतांच्या संदर्भात गेल्या ३ वर्षाची माहिती पाहिजे होती.

झालेल्या विलंबाचा खुलासा करतांना हॉस्पीटल व मेडिकल कॉलेजच्या डिन यांनी असे सांगितले की, यासंदर्भात श्रीयुत चेतन कोठारी यांच्याशी डिसेंबर, २००८ मध्ये चर्चा करण्यात आली होती व त्यांना मुदतीत माहिती देता येवू शकणार नाही याची कल्पना देण्यांत आलेली होती. तसेच श्री. चेतन कोठारी यांनी जानेवारी २००९ मध्ये हॉस्पीटला भेट दिली असता हॉस्पीटलचे डिन, एम.आर.ओ., वरिष्ठ लिपीक व लिपीक यांच्याबरोबर चर्चा करुन अपीलार्थींना द्यावयाची माहिती काढण्यासाठी कराव्या लागणा-या कामाची कल्पना देण्यांत आली होती, व यासासाठी जवळपास दिड लाख पेशंटचा रेकॉर्ड हा तपासावा लागणार होता. त्याकरिता हॉस्पीटलने ५ जादा स्टाफ मेंबर्स या कामासाठी देवून वरील काम पूर्ण करण्यात आले. त्यासाठी दोन ते अडीच महिने लागले व ही माहिती अपीलार्थीस तद्नंतर देण्यांत आली.

अपीलार्थींच्या म्हणण्यानुसार के.ई.एम. हॉस्पीटलने हिच माहिती देण्यासाठी कमी कालावधी घेतला. प्रत्येक हॉस्पीटलची परिस्थिती थोडीफार फरकाने असू शकते. मात्र यासंदर्भात रेकॉर्डचे कम्प्यूटरायझेशन करुन घेण्याचा प्रस्ताव डिन यांनी महापालिकेकडे पाठवावा असे निर्देश देण्यांत आले. जेणेकरुन पुढे मुदतीत माहिती देण्यास कुठच्याहि प्रकारची अडचण भासणार नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यांत आले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २२ मे, २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ४३५०/०२
क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ४३५१/०२

श्री. चेतन कोठारी -----अपीलार्थी
५२ ओशियानिक अपार्टमेंट,
डॉ. राजबली पटेल लेन, बी. देसाई रोड,
मुंबई - ४०० ०२६.

विरुध्द

१. प्रादेशिक परिवहन अधिकारी मुंबई (पश्चिम) -----उत्तरवादी
१११ डी, आंबीवली व्हिलेज, मनिष नगर,
चारबंगला, अंधेरी (पश्चिम) मुंबई -५३ .

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय परिवहन अधिकारी
१११ डी, आंबीवली व्हिलेज, मनिष नगर,
चारबंगला, अंधेरी (पश्चिम) मुंबई -५३ .

२. महासंचालक
अँटी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य,
मधु इंडस्ट्रीयल इस्टेट, १ ला मजला,
पांडुरंग बुधकर मार्ग, लोअर परेल, मुंबई १३

जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक
अँटी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य,
मधु इंडस्ट्रीयल इस्टेट, १ ला मजला,
पांडुरंग बुधकर मार्ग, लोअर परेल, मुंबई १३

***---विवेचन---***

वरील दोन्ही अपीलांची सुनावणी दि. २१ मे, २००९ रोजी घेण्यात आली. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

मात्र अपीलाथी श्री. चेतन कोठारी यांनी वरील दोन्ही अपीलांच्या बाबतीत त्यांना जी माहिती देण्यांत आलेली आहे त्याने ते समाधानी आहेत व आता त्यांना अपीले चालवायची नाहीत असे आयोगास लिहून दिलेले आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २२ मे, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ४३५३/०२

कुमारी रुपाली आनंदराव जवळकर -----अपीलार्थी
गुरुनानक नगर, पंतनगर, ९० फूट रोड,
घाटकोपर (पूर्व) मुंबई - ४०० ०७५.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त (परि ६) -----उत्तरवादी
पोलीस उप आयुक्त परि-६ चेंबूर,
मुंबई ७१

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पुर्व प्रादेशिक विभाग नियंत्रण कक्ष,
चेंबूर, मुंबई - ७१

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १६ एप्रिल, २००९
सुनावणीची तारीख २१/५/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलीय अधिका-यांनी त्यांच्या दि. ३१/१२/२००८ रोजीच्या प्रथम अपीलातील आदेशानुसार कांही मुद्दयांची माहिती देण्याचे निर्देश दिले, तर काही माहिती गुन्हयाचा तपास चालू असल्यामुळे माहिती देता येणार नाही असे निर्देश दिलेले आहेत.

सध्या केसची सद्यःस्थिती काय आहे असे विचारले असता सदरील केसमध्ये चार्जशिट दाखल करण्यात आलेली आहे असे जन माहिती अधिका-यांनी सांगितले. त्यांच्या मुळ अर्जातील आता कोणत्या मुद्दयांची माहिती हवी आहे असे अपीलार्थी यांना विचारले

असता दि. ३१/१०/२००८ रोजीच्या त्यांच्या मुळ अर्जातील ७, ८, ९ व १२ या परिच्छेदांची माहिती पाहिजे असे त्यांनी सांगितले.

यातील राजावाडी रुग्णालयात अपीलार्थीचे नांवे असलेले मुळ केसपेपर जे पोलीस ठाण्यात आहेत ते मिळण्याची मागणी अपीलार्थीची आहे. मात्र मुळ पेपर्स तसे देता येणार नाही. मात्र त्याची सत्यप्रत अपीलार्थीस देण्यात यावी. तसेच आता चार्जशीट दाखल झाली असल्यामुळे वर निर्देशित केलेल्या परिच्छेदातील मुद्दयांची माहिती अपीलार्थीस १५ दिवसांचे आत देण्यात यावी.

***---आदेश---***

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

सर्व संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २२ मे, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ४३५६/०२

श्री. रामचंद्र सावळाराम नेमळेकर -----अपीलार्थी
जे.एल.तांबे नगर, प्रतिमा, बी/ १२,
तळमजला, सरोजनी नायडू मार्ग,
मुलुंड (पश्चिम) मुंबई--- ४०० ०८०.

विरुध्द

१. विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना) -----उत्तरवादी
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१.

२.जन माहिती अधिकारी तथा उप सहायक पोलीस महानिरीक्षक (आस्था २)
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक १६ एप्रिल, २००९
सुनावणीची तारीख २८/५/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस दि. २७/४/१९९३ च्या पोलीस आयुक्त कार्यालयातील गोपनीय शासकीय आदेशानुसार सहायक पोलीस निरीक्षक पदावरुन पोलीस उपनिरीक्षक पदावर पदावनत करण्यात आले होते. तसेच त्यांच्याविरुध्द एक वार्षिक वेतनवाढ २ वर्षाकरीता रोखण्याची शिक्षाहि प्रस्तावित करण्यात आली होती त्यासंदर्भात त्यांनी दि. २४/११/२००८ रोजीच्या अर्जाने माहिती विचारली होती. ती माहिती त्यांना दि. ४ डिसेंबर २००८ रोजीच्या पत्राने देण्यांत आली. दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी केलेल्या प्रथम

अपीलाच्या आदेशात दिलेली माहिती योग्य आहे तसेच माहितीच्या अधिकारांतर्गत स्पष्टीकरणात्मक उत्तर देण्याची तरतुद नाही, तथापि अपीलार्थीचे पदोन्नतीबाबतचे प्रकरण निवड समितीपुढे ठेवण्यात आले असून त्यामध्ये दिलेल्या निर्णयानुसार त्यांच्या पदोन्नतीचा विचार करण्यात येईल असे नमूद करुन अपील निकाली काढण्यात आले होते त्याविरुध्दचे सदरचे अपील आहे.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर रेकॉर्डप्रमाणे असलेली सर्व माहिती अपीलार्थीस दिलेली आहे. तसेच त्यांच्या पदोन्नतीसंबंधीचे प्रकरण हे सुध्दा विचाराधिन आहे याचीहि माहिती अपीलार्थीस दिलेली आहे. त्यामुळे रेकॉर्डप्रमाणे माहिती देण्यात जन माहिती अधिका-यांकडून कुचराई झालेली दिसून येत नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २८ मे, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९९२४/अपील क्रमांक ४३६१/०२
क्रमांक-मु.मा.आ/३९९२५/अपील क्रमांक ४३६२/०२
क्रमांक-मु.मा.आ/३९९२६/अपील क्रमांक ४३६३/०२

श्री. हरिष चंदू बडेकर -----अपीलार्थी
३०४/७, तेजोमय को. ऑप.हौ.सोसायटी
सेक्टर ३, चारकोप कांदिवली (पश्चिम)
मुंबई - ४०० ०६७.

विरुध्द

१. सह सचिव -----उत्तरवादी
महसूल व वन विभाग / ई- ७,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

२.जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग / ई- ७,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

---*विवेचन*---

अपीलाचे दिनांक १८ एप्रिल, २००९
सुनावणीची तारीख २८/५/२००९
अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

या तिन्ही अपीलातील मुळ अर्जाद्वारा अपीलार्थीस कालबध्द पदोन्नती, कोणत्याही माध्यमाशिवाय थेट नियुक्त झालेल्या आयोग अपुरस्कृत कर्मचा-यांच्या सेवा नियमित करणेबाबत माहिती पाहिजे होती. याबाबत भरावे लागणारे शुल्क मुदतीत कळवून अपीलार्थीस ती माहिती शुल्क भरल्यानंतर देण्यांत आलेली आहे.

अपीलार्थी हे प्रथम अपील व द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अनुपस्थित होते. आयोगापुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

तिन्ही अपीलांत अपील करण्याचे कुठचेहि कारण दर्शविलेले नाही. कागदपत्रांची पाहणी केली असता अपीलार्थीस शासन निर्णय नमूद करुन माहिती दिलेली असल्याचे दिसून आले. सुनावणीस अपीलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

तिन्ही अपीले अमान्य करण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २८ मे, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९९२१/अपील क्रमांक ४३६४/०२

श्री. रझाक मोहम्मद सुलेमान -----अपीलार्थी
रेहमनी टॉवर, फ्लॅट नं. १९०१,
७/९/११, मोहमद उमर रझाब रोड,
मदनपुरा, मुंबई - ४०० ००८.

विरुध्द

१. सहायक मनपा आयुक्त -----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
ई वार्ड, १० शेख हफिझुद्दीन मार्ग,
भायखळा, मुंबई - ४०० ००८.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
ई वार्ड, १० शेख हफिझुद्दीन मार्ग,
भायखळा, मुंबई - ४०० ००८.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १५ एप्रिल, २००९
सुनावणीची तारीख २८/५/२००९
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस त्यांनी दि. ३१/१०/२००८ रोजी जी अब्दुल करीम वाडिया, फ्लॅट नं. १९०४ रेहमानी टॉवर यांनी केलेल्या अनधिकृतपणे बांधकामाबाबतची तक्रार केली होती त्या तक्रारीवर काय कारवाई करण्यांत आली अशी माहिती विचारली होती.

यास वरील तक्रारीनंतर संबंधितावर मुंबई महानगरपालिका कायद्याच्या कलम ३५१ नुसार नोटीस बजावण्यात आलेली आहे असे कळविण्यांत आले, व या नोटीसची प्रत अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे.

प्रथम अपीलाच्या वेळेला असलेली माहिती ही अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे असे ठरविण्यात आले व अपील निकाली काढण्यात आले.

आयोगाकडे आलेल्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिलेल्या नोटीशीच्या संदर्भात श्रीयुत रझाक यांच्या वकीलांनी घरातील स्त्री सदस्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ते बांधकाम केलेले आहे त्याचे समर्थन करुन त्याविषयी परवानगी मागितलेली आहे.

वरील निवेदन हे विचाराधीन आहे व त्यावर अंतीम निर्णय होताच अपीलार्थीस कळविण्यात येईल. त्यामुळे सद्य:स्थितीची माहिती अपीलार्थीस कळविण्यांत आलेली आहे असे आयोगास दिसून आले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. २८ मे, २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९९५४/अपील क्रमांक ४३६९/०२

श्री.नरेंद्र भिकाजी सावंत -----अपीलार्थी
५/१४८, सहकार नगर, ३, चेंबूर,
मुंबई - ४०० ०७१.

विरुध्द

१. प्रमुख वैद्यकीय अधीक्षक -----उत्तरवादी
२ रा मजला, के.बी.भाभा रुग्णालय,
वांद्रे (पश्चिम) मुंबई - ५२.

२.जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी
राजावाडी रुग्णालय, घाटकोपर (पश्चिम)
मुंबई - ४०० ०८६.

---*विवेचन*---

अपीलाचा दिनांक ३१ मार्च २००९
सुनावणीची तारीख २९/५/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी त्यांच्या दि. २/५/२००८ रोजीच्या अर्जाप्रमाणे माहितीच्या अधिकारांतर्गत वैद्यकीय प्रमाणपत्र क्रमांक ०२९६६१ व ०३९३६६ च्या प्रमाणित नक्कल प्रत मिळण्यासाठी अर्ज केला होता व त्यांना दि. १२/५/२००८ रोजी सदर प्रमाणपत्र देता येत नाही असे कळविण्यांत आले होते.

अपिलीय आदेशात अपिलीय अधिकारी यांनी याबाबतीत कायदेशीर सल्ला घ्यावा असे निर्देश जन माहिती अधिकारी यांना दिला. अंतिमतः अपीलार्थीस माहिती न देण्याचेच

ठरल्यामुळे अपीलार्थींनी आयोगाकडे सदरचे द्वितीय अपील सादर केले आहे.

अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेला पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

"अशी प्रमाणपत्रे न्यायालयास सादर करण्यास पोलीस विभागामार्फत देण्यात येतात किंवा संबधित रुग्णाने लेखी अनुमती दिल्यास प्रत दुस-या व्यक्तीस देणे शक्य असते या प्रकरणात पोलीसांनी संबंधित प्रमाणपत्रे न्यायालयास सादर केलेली आहेत व त्याची प्रत श्री. सावंत यांना प्राप्त झाली आहे असे श्री.सावंत यांच्या अर्जात नमूद केलेले आहे. आंतररुग्ण विभागात दाखल करण्यात येणा-या रुग्णांच्या निवासस्थानांचे पत्ते घेण्यात येतात परंतु रुग्णांच्या प्रचंड संख्येमुळे बाहयरुग्ण विभागाच्या केसपेपर्सवर तपशीलवार पत्ता लिहिला जात नाही, रुग्णांचे नांव, वय व फक्त लोकेशन लिहिण्यात येते. सदर रुग्णाला बाहयरुग्ण विभागात उपचार करण्यात आले होते त्यामुळे श्री.सावंत यांना सदर प्रमाणपत्राची पुन्हा नक्कल देण्यासाठी संबंधित रुग्णाची लेखी अनुमती प्राप्त करण्यासाठी संपर्क साधणे शक्य नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या दिवशी स्पष्ट केले होते.

याबाबत महानगरपालिकेच्या कायदा विभागाचे मत त्वरित प्राप्त करण्यात यावे व त्यानुसार पुढील कार्यवाही करावी असे जन माहिती अधिकारी यांना सुनावणीच्या दिवशी आदेश देऊन अपील निकाली काढण्यात आले होते.

वैद्यकीय अधीक्षक, राजावाडी रुग्णालय तथा जन माहिती अधिकारी यांनी त्यानंतमर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कायदा विभागाचे मत घेऊन त्यानुसार श्री.नरेंद्र सावंत यांना कळविले आहे."

अपीलार्थीच्या म्हणण्यानुसार ते ज्या खटल्यातील आरोपी आहेत त्यात त्यांना जरी पोलीस विभागाकडून प्रमाणपत्राच्या प्रती मिळाल्या असल्या तरी हॉस्पीटलमधून सुध्दा त्यांना प्रमाणपत्राची प्रत मिळण्याची आवश्यकता आहे. तेव्हा जन माहिती अधिकारी यांनी संबंधित पोलीस स्टेशनकडून ज्यांच्याकडे वैद्यकीय प्रमाणपत्र पाठविण्यात आले होते, त्यांचे पत्ते मिळवावेत व ज्यांचे मेडिकल सर्टिफिकेटस आहेत त्या व्यक्ती त्रयस्थ पक्ष असल्यामुळे त्यांना त्यांच्यासंबंधीची माहिती देण्यास हरकत नाही किंवा कसे याबाबत अधिनियमाच्या

**कलम ११ प्रमाणे विचारणा करावी व त्यांच्या उत्तराचा विचार करुन याबाबतीत निर्णय द्यावा असे निर्देश देण्यात येत आहेत.**

***---आदेश---***

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**
**संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांक. २९ मे, २००९**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९९५७/अपील क्रमांक ४३७२/०२

श्री.वसंत रामा जाधव -----अपीलार्थी
सेवानिवृत्त माळी, वांद्रे पोलीस ठाणे,
वांद्रे पोलीस वसाहत, बी इमारतीमागे,
बैठी चाळ, रुम नं.१, वांद्रे (पश्चिम) मुंबई ५०.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त -----उत्तरवादी
परिमंडळ ९ यांचे कार्यालय, वांद्रे (पश्चिम)
मुंबई - ४०० ०५०.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम नियंत्रण कक्ष, वांद्रे (पश्चिम) मुंबई - ५०.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ३ एप्रिल २००९
सुनावणीची तारीख २९/५/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सेवानिवृत्तीनंतर अनधिकृतपणे राहात असल्यामुळे श्रीयुत जाधव यांचे निवासस्थान सक्तीने रिक्त करुन घेण्यांत आलेले आहे, व त्यांना निवृत्ती सेवाउपदान सुध्दा देण्यांत आलेले नाही. म्हणून अपीलार्थी यांनी माहिती मागितलेली होती.

निवृत्तीनंतर अनधिकृतपणे राहात असलेल्या कालावधीच्या भाडयाची रक्कम ही निवृत्ती उपदानापेक्षाहि जास्त होत आहे असे सुनावणीच्या वेळेस सांगण्यांत आले.

अपीलार्थींचा अर्ज हा विशेषेकरुन माहितीच्या अधिकारांतर्गत नसून तक्रारनिवारण अर्ज असल्यामुळे त्याची योग्यती दखल विभागाने घ्यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २९ मे, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९९७२/अपील क्रमांक ४३७४/०२

श्री.तुषार द. म्हात्रे -----अपीलार्थी
"राम- कुटी", एन.बी. रोड,
विठ्ठल पाडा, चिंचवली, मालाड (पश्चिम)
मुंबई - ४०० ०६४.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त -----उत्तरवादी
परिमंडळ १२, शैलेंद्र नगर, दहिसर (पूर्व)
मुंबई - ४०० ०६८.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व)
मुंबई - ४०० १०१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ३ एप्रिल २००९
सुनावणीची तारीख २९/५/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. तुषार द. म्हात्रे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ अन्वये जन माहिती अधिकारी कार्यालयात माहिती मिळण्याकरिता दि. १७/१/२००९ रोजी अर्ज सादर केला होता. सदर अर्जात त्यांनी (१) दि. १०/१०/२००८ विठ्ठलपाडा, मालाड येथे राहणारे श्री. विनोद शिंदे यांचे हळदी कार्यक्रमावेळी पोलीसांनी दिलेल्या ध्वनीक्षेपक परवान्याची प्रत (२) दि. १६/१२/२००८ रोजी विठ्ठलपाडा मालाड येथे राहणारे श्री.

नंदकुमार मिस्त्री यांचे मुलीचे हळदी कार्यक्रमावेळी पोलीसांनी दिलेल्या ध्वनीक्षेपक परवान्याची प्रत (३) ॲड्. किशोर यु. जोशी यांनी अपीलार्थी विरुध्द केलेला तक्रार अर्ज, महापालिकेचे पत्र व अपीलार्थी यांचे जबाबाची प्रत याची मागणी केली होती.

मागितलेली माहिती ही मालाड पोलीस ठाणेशी संबंधित असल्याने ती वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मालाड पोलीस ठाणे यांचेकडून मागविण्यात आली. त्यात मुद्दा क्र. १ व २ ची माहिती कोणतेही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी तसेच व्यापक लोकहिताचे दृष्टीने नाकारण्यात आली व मुद्दा क्र. ३ ची माहिती प्राप्त झाली. प्राप्त माहिती अपीलार्थी यांनी दि. ३१/१/२००९ रोजी व्यक्तिशः स्वीकारली.

अपीलार्थींचे दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी व पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १२ मुंबई यांचेकडे अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी होवून त्यात अपिलीय अधिकारी यांनी अपील आदेशात जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती बरोबर असल्याचे आदेश पारित केले आहेत.

सदर आदेशाविरुध्द अपीलार्थीनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले होते त्याची सुनावणी दि. २९ मे, २००९ रोजी घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, " अपीलार्थी यांचेविरुध्द मालाड पोलीस ठाणे येथे चार दखलपात्र तसेच बरेच अदखलपात्र स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. अपीलकर्त्यांविरुध्द स्थानिक नागरिकांच्या अनेक तक्रारी पोलीस ठाणे अभिलेखावर असल्याने अपीलार्थी यांना सध्या हद्दपार आदेश क्र. ३१/सी/४३/परि-११/०९ दिनांक २५/२/२००९ प्रमाणे दोन वर्षे कालावधीकरीता मुंबई व ठाणे जिल्हयाचे हद्दीतून हद्दपार करण्यात आले आहे. "

माहिती नाकारण्याचे कारण विषद करतांना असे सांगण्यात आले की, याअगोदर अपीलार्थीना ब-याचदा अशा प्रकारची माहिती देण्यांत आलेली होती. म्हणून अपीलार्थी हे त्याचा दुरुपयोग करतात असे दिसून आल्याने सदरील माहिती देण्यांत आलेली नाही. तसेच अपीलार्थींच्या अर्जातील मुद्दा क्र. ३ मधील सर्व प्रती साक्षांकित करुन त्यांना पाठविण्यात आलेली आहे. जी माहिती नाकारलेली आहे ती दिली असती तर लोकहित साध्य झाले असते असे दिसून येत नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक. ३० मे, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९९६५/अपील क्रमांक ४३७५/०२

श्री. प्रकाश गोविंद नवाथे -----अपीलार्थी
२०४, राजबाग, भालचंद्र मार्ग,
माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.

विरुध्द

१. उपमुख्य अभियंता ग्राहक सेवा(उत्तर) -----उत्तरवादी
बेस्ट उपक्रम, २रा मजला, परिवहन अभियांत्रिकी इमारत,
टिळक रोड, दादर (पूर्व) मुंबई १४ .

२.जन माहिती अधिकारी तथा विभागीय
अभियंता ग्राहक सेवा (फ/उत्तर )
न्यू ॲन्सिलरी बिल्डींग, ६ वा मजला,
वडाळा आगार, मुंबई - ४०० ०१४.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ३१ मार्च, २००९
सुनावणीची तारीख २९/५/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस विज पुरवठा करताना ऑक्युपेशन सर्टिफिकेटची गरज यासंबंधीची माहिती पाहिजे होती. याबाबत त्यांना उप सचिव उर्जा यांच्या दि. १७/१०/१९९७ चे पत्राची प्रत देण्यांत आलेली आहे. अपीलार्थीस त्यांनी विचाल्याप्रमाणे आजमितीपर्यंत हॅपी व्हॅली रिअल इस्टेट यांना ऑक्युपेशन सर्टिफिकट बेस्ट उपक्रमाकडे सादर केलेले नाही ही माहितीही दिलेली आहे. तसेच एखादया जागेच्या मालकाने अथवा वहिवाटदाराने अर्ज केल्यास वितरण परवानाधारकास त्या जागेस विद्युत पुरवठा करणे हे विद्युत अधिनियम

२००३ मधील कलम ४३ नुसार बंधनकारक राहिल असेहि अपिलीय अधिका-यांच्या आदेशात नमूद करण्यात आलेले आहे. त्यामुळे अपीलार्थीस हवी असलेली माहिती त्यांना देण्यांत आलेली आहे असे दिसून आले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३० मे, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९९६४/अपील क्रमांक ४३७६/०२

श्री. प्रकाश गोविंद नवाथे -----अपीलार्थी
२०४, राजबाग, भालचंद्र मार्ग,
माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.

विरुध्द

१. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबई १ -----उत्तरवादी
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,
जी.पी.ओ. समोर, मुंबई - ४०० ००१.

२.जन माहिती अधिकारी तथा सहा. निबंधक
सहकारी संस्था, एम /एन विभाग.
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,
जी.पी.ओ. समोर, मुंबई - ४०० ००१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ३१ मार्च, २००९
सुनावणीची तारीख २९/५/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सहायक निबंधक एफएन विभाग यांनी दलुचंद को.ऑप.हौसिंग सोसायठी लि. या संस्थेस दि. २४/७/२००८ रोजीच्या पत्राने अपीलार्थी श्री.नवाथे यांच्या तक्रार अर्जातील मुद्दयांवर संस्थेकडून खुलासा मागितला होता. सदर खुलासा प्राप्त झाला नसल्यास संस्थेवर कोणती कारवाई केली याचा अहवाल अपीलार्थींना हवा आहे.

सुनावणीच्या वेळी असे सांगितले की, आता संस्थेवर प्रशासक नेमला गेला असल्यामुळे त्यांच्याकडून अपीलार्थीस हवी असलेली माहिती १० दिवसांच्या आत घेवून ती अपीलार्थीस देण्यात येईल. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३० मे, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९९६४/अपील क्रमांक ४३७८/०२

श्री. मोहंमद युसुफ मूसा पटनी -----अपीलार्थी
३ रा मजला, रुम नं. १४, २५१/२५३,
सौदागर बिल्डींग , नागदेवी स्ट्रीट,
मुंबई - ४०० ००३.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त -----उत्तरवादी
परिमंडळ २, सर जे.जे. रोड, नागपाडा,
मुंबई - ४०० ००८.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
दक्षिण प्रादेशिक विभाग, सर जे.जे. रोड,
नागपाडा, मुंबई - ४०० ००८.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ३१ मार्च, २००९
सुनावणीची तारीख ३०/५/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २३/१/२००९ रोजीच्या आदेशात त्यांच्यासमोर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक श्री. सोनार यांना अपीलार्थी जे आरोपी आहेत त्यांच्याविरुध्द दाखल करण्यात आलेल्या गुन्हयाचे दोषारोपपत्र ६ दिवसांत सादर करण्यात येणार असून तद्नंतर अपीलार्थीस सदर कागदपत्रांच्या प्रती देण्यात येणार असल्याचे सांगितले. तेव्हा अपीलार्थीना त्याप्रमाणे माहिती देण्यात यावी असे आदेश देण्यांत आले होते. मात्र सदरील माहिती अजून मिळालेली नाही असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

सुनावणीच्या वेळेला असे सांगण्यांत आले की, त्यावेळेस ५ ते ६ दिवसांत दोषारोपपत्र दाखल करण्यात येईल असे वाटले होते. पण त्यानंतर तपास पूर्ण होवू शकला नसल्यामुळे माहिती देता येत नाही असे सांगण्यांत आले. तपास पूर्ण करुन दोषारोपपत्र दाखल करण्यास अजून किती दिवस लागतील असे विचारले असता अंदाजे १५ दिवस लागतील असे सांगण्यांत आले. तेव्हा अपीलार्थीस आवश्यक ती माहिती ही ३ आठवडयांच्या आंत देण्यांत यावी असे निर्देश देण्यांत आले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. ३० मे, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९९६१/अपील क्रमांक ४३७९/०२

श्री. बलजित सिंह डोग्रा -----अपीलार्थी
जय जवान स्टॉल, भेल प्लाझा,
गिरगांव चौपाटी, मुंबई - ४०० ००७.

विरुध्द

१. सहायक आयुक्त -----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, डी विभाग कार्यालय,
नाना चौक, जोबनपुत्र कंपाऊंड,
ग्रँट रोड (पश्चिम), मुंबई ४०० ००७.

२.जन माहिती अधिकारी तथा सॅ. इन्स्पेक्टर (लायसन्स)
बृहन्मुंबई महानगरपालिका, डी विभाग कार्यालय,
नाना चौक, जोबनपुत्र कंपाऊंड,
ग्रँट रोड (पश्चिम), मुंबई ४०० ००७.

---*विवेचन*---

अपीलाचा दिनांक ३१ मार्च, २००९
सुनावणीची तारीख ३०/५/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस माजी सैनिकांना जय जवान स्टॉलच्या बाबतीत लायसन्स फी भरण्यापासून सुट द्यावी याबाबत माहिती पाहिजे होती. व ही माहिती अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे असेच सुनावणीच्या वेळेला दिसून आले. सन १९८८ सालापर्यंत लायसेन्स फी मध्ये सुट देण्याची पध्दती होती. पण ती पध्दत तेव्हापासून बंद करण्यात आलेली आहे.

त्यानुसारच अपीलार्थी श्री. बलजित सिंह डोग्रा यांना याबाबतची पुढील परिस्थिती आहे असे सांगण्यांत आले.

"सदर स्टॉल हा प्रथमत: श्री. गंगाराम डोग्रा माजी सैनिक यांना सन १९७३ मध्ये देण्यात आला होता व त्यांना सन १९७३ पासून मे १९८५ पर्यंत अनुज्ञापन शुल्कामधून सूट देण्यात आली होती.

तद्नंतर सन १९८५ मध्ये सदर स्टॉल, त्यांचा मुलगा श्री. बलजितसिंग डोग्रा यांच्या नावे हस्तांतरित करण्यात आला. त्यानंतर त्यांनी मार्च २००० पर्यंत अनुज्ञापन शुल्क भरलेले आहे.

श्री. बलजितसिंग डोग्रा यांनी सदर स्टॉलचे एप्रिल २००० पासून अनुज्ञापन शुल्क भरलेले नसून त्यांनी १३/४/२००७ रोजी परिपत्रक क्र एसएल/७७ वर्षे ७२-७३ प्रमाणे अनुज्ञापन शुल्क माफ करण्यात यावे असा अर्ज सादर केला. परिपत्रक क्र एसएल/१०४ वर्ष १९८८-८९ नुसार श्री. डोग्रा यांना दि. २३/४/२००७, २८/१२/२००७, २६/२/२००८ व १०/४/२००८ रोजी अनुज्ञापन शुल्क भरण्यास कळविण्यात आले. "

अपीलार्थीस हवी असलेली माहिती देण्यांत आलेले आहे असेच सुनावणीच्या वेळेस दिसून आले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३० मे, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९९३४/अपील क्रमांक ४३८३/०२

श्री. नितीन तुकाराम गवाणकर -----अपीलार्थी
०५, गवाणकर निवास, साईकृपा बिल्डींगसमोर,
शिववल्लभ मार्ग, दहिसर (पूर्व) मुंबई ६८.

विरुध्द

१. उपजिल्हाधिकारी (अति/निष्कासन) -----उत्तरवादी
यांचे कार्यालय, बृहन्मुंबई मनपा मंडई,
तळमजला, रुस्तमजी कॉम्प्लेक्स, जयवंत सावंत मार्ग,
दहिसर (पश्चिम) मुंबई - ४०० ०६८.

२.जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (अति/निष्का)
बोरीवली
उपजिल्हाधिकारी (अति/निष्कासन) यांचे कार्यालय
बृहन्मुंबई मनपा मंडई,तळमजला, रुस्तमजी कॉम्प्लेक्स,
जयवंत सावंत मार्ग, दहिसर (पश्चिम) मुंबई - ४०० ०६८.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ४ एप्रिल, २००९
सुनावणीची तारीख ३०/५/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अपीलार्थीनी त्यांच्या दि. १९/११/२००८ रोजीच्या पत्रानुसार दि. १३/५/२००८ रोजी जे पत्र दिले होते त्यात पावती क्र. १४५२६९० या फोटो पावतीचा संपूर्ण पत्ता, बांधकामाचे क्षेत्रफळ, झोपडपट्टीचा सर्व्हे नं. याविषयीची माहिती मागितली होती.

त्यास दि. १२/१२/२००८ रोजी गणना फॉर्मची प्रत त्यांचे कार्यालयातील अभिलेख तपासणीचे काम चालू आहे व सदर गणना फॉर्म प्राप्त होतच आपणाला माहिती पुरविण्यात

येईल असे दि. १२/१२/२००८ रोजीच्या पत्राने कळविण्यात आले. तद्नंतर दि. २९/१/२००९ रोजी सुध्दा शोध घेवूनहि गणना फॉर्म सापडत नाही म्हणून पुरविता येत नाही. मात्र सदर गणना फॉर्म क्रमांक हा त्यांच्याच कार्यालयातील असून सदर बाब कार्यालयीन अभिलेख नोंदवहीवरुन दिसून येते असे स्पष्टपणे कळविलेले आहे. मात्र अजूनहि गणना फॉर्म न मिळाल्याने अपीलार्थी यांनी द्वितीय अपील सादर केलेले आहे.

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी पुन्हा ७ दिवसांत जारीने शोध घेऊन सदर गणना फॉर्म शोधून काढण्याचा प्रयत्न केला जाईल व अपीलार्थीस तो देण्यात येईल असे सांगितले.

शोध घेवूनहि गणना फॉर्म सापडत नसेल तर त्याचा अहवाल शासकीय जन माहिती अधिकारी यांनी अप्पर जिल्हाधिकारी( अतिक्रमण निष्का ) यांच्याकडे पाठवावा व अप्पर जिल्हाधिकारी यांनी याबाबत कारवाई करावी. व केलेल्या कारवाईचा अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.
या आदेशाची प्रत अप्पर जिल्हाधिकारी यांनाहि पाठविण्यात यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३० मे, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३८७३८/अपील क्रमांक ४२६३/०२
क्रमांक-मु.मा.आ/३८७४१/अपील क्रमांक ४२६४/०२

श्री. विजय हरिश्चंद्र धात्रक -----अपीलार्थी
७/७०२, इंदर पॅलेस, देवीदास लेन,
निल टॉवर कंपाऊंड, बोरीवली (पश्चिम)
मुंबई - ४०० ०९२.

विरुध्द

१. पोलीस अधीक्षक -----उत्तरवादी
राज्य गुन्हे अन्वेशन विभाग,
कोंकण विभाग, नवी मुंबई.

२.जन माहिती अधिकारी
राज्य गुन्हे अन्वेशन विभाग,
कोंकण विभाग, नवी मुंबई.

*---विवेचन---*

श्री. विजय हरिश्चंद्र धात्रक यांनी आयोगाकडे दि. ५/२/२००९ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये जी उसेप स्वतंत्र द्वितीय अपीले केली त्या अपीलांची सुनावणी दि. ५/५/२००९ रोजी मुंबई येथील आयोगाच्या कार्यालयात घेण्यात आली. त्यावेळेला अपीलार्थी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींनी दि. ७/८/२००८ व दि. १२/९/२००८ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपीलार्थीच्या निलंबनानंतर पुनःस्थापित करण्याच्या संदर्भात अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अहवालाच्या प्रतीची मागणी केली होती. सदर मागणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.

११/९/२००८ व १०/१०/२००८ च्या पत्रान्वये अधिनियमाच्या कलम ८ (आय) प्रमाणे नाकारली. त्यामुळे अपीलार्थीनी व्यथित होवून दि. १२/९/२००८ व १७/१०/२००८ रोजी प्रथम अपीले केली. त्या अनुषंगाने दि. २४/१०/२००८ रोजी सुनावणी घेवून जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारणे योग्य असल्याचे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी नमूद केले. तसेच अपीलार्थींनी सुनावणीच्या दरम्यान विनंती केल्याप्रमाणे जर प्राथमिक चौकशी दरम्यान प्राथमिक चौकशी अधिकारी यांनी अहवालाची मागणी केल्यास सदर अहवालाची प्रत त्यांना तात्काळ पुरविण्याचे दोन स्वतंत्र आदेश दि. २४/१०/२००८ रोजी पारित केले. असे असले तरी सदर आदेशाने समाधान न
झाल्याने अपीलार्थींनी मागणी केलेल्या अहवालाची प्रत स्वतःशी संबंधित असल्याने अपीलार्थींना देण्यास हरकत नाही, त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांचा निर्णय चुकीचा असल्याने त्यांना माहिती पुरविण्याची द्वितीय अपीलात मागणी केली आहे.

आयोगाकडील सुनावणीच्या वेळेला दोन्ही पक्षकारांची बाजू ऐकून घेण्यात आली. तसेच सदर प्रकरणात आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची सखोळ तपासणी करण्यात आली. त्यावरुन असे निदर्शनास आले की, अपीलार्थींना पुनःस्थापित करण्यात आले आहे. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा अहवाल अपीलार्थीसह इतर अधिकारी/ कर्मचारी यांच्याबाबत आहे.

असे असले तरी सदर अहवालाची मागणी प्राथमिक चौकशी करणा-या अधिका-यांनी केल्यास त्यांना तात्काळ उपलब्ध करण्यात येणार आहे. थोडक्यात सदर प्रकरणात अद्याप चौकशी सुरु असल्याने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या निर्णयाशी आयोग सहमत आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

*---आदेश---*

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३० मे, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३९९५८/अपील क्रमांक ४३७३/०२

डॉ. एस.एस. प्रभू -----अपीलार्थी
बी-२३, उद्यान प्रभा, तेजपाल स्कीम रोड नं.२,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई - ४०० ०५७.

विरुध्द

१. उप सचिव / ५-स, -----उत्तरवादी
सहकार व वस्त्रोद्योग व पणन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

२.जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
सहकार व वस्त्रोद्योग व पणन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २८ मार्च, २००९
सुनावणीची तारीख २९/५/२००९
अपीलार्थी , अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

डॉ. श्रीकांत प्रभू यांनी दि. १७/९/२००८ रोजी एक पत्र सहकार विभागास पाठविले होते, व त्या पत्रावर काय कारवाई करण्यात आली याबाबत त्यांनी माहितीच्या अधिकारांतर्गत दि. १०/१२/२००८ रोजी अर्ज केला होता. अपीलार्थीस दि. ७ जानेवारी, २००९ रोजीच्या पत्राने, सदरील पत्राबाबत सहकार आयुक्त पुणे यांच्याकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे. याबाबत सहकार आयुक्त कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली असून त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल असे त्या पत्रात नमूद केले होते.

तसेच नागरिकांची सनद ही पुस्तिका प्रसिध्द करण्यात आली असून त्याचे मुल्य रु. १५/- असून ही पुस्तिका शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय किंवा कार्यासन अधिकारी, कार्या- ६ , सहकार विभाग यांचकडे विहित शुल्क भरुन उपलब्ध होवू शकेल अशीही माहिती अपीलार्थीस कळविण्यात आली होती. त्याने समाधान न झाल्यामुळे जे प्रथम अपील दाखल केले होते त्या अपीलाच्या सुनावणीस डॉ. प्रभू उपस्थित राहू शकले नव्हते. अपिलीय आदेशात फक्त एकाच नवीन बाबीची माहिती आलेली आहे ती म्हणजे, दरम्यान विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था मुंबई विृभाग मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार डॉ. प्रभू यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने श्रीयुत पी.पी. गोसावी यांना चौकशी अधिकारी म्हणून नेमलेले आहे व चौकशी सुरु असून त्याचा अहवाल अजून प्राप्त झालेला नाही, व श्री. पी.पी. गोसावी यांच्याकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

वरील माहितीने समाधान न झाल्यामुळे अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सदर अपीलाची सुनावणी दि. २९ मे, २००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींच्या कलम ६ च्या अर्जात माहितीच्या नस्तीची प्रत्यक्ष तपासणीची मागणी सुध्दा होती. मात्र तेव्हा अपीलार्थीच्या मुळ तक्रार अर्जाच्या संबंधात त्यांचे समाधान करण्याच्या दृष्टीने अपीलार्थींच्या मुळ तक्रार अर्जाबाबत जी मुळ नस्ती आहे त्या नस्तीची संपूर्ण प्रत अपीलार्थीस पोष्टाने विनामूल्य पाठविण्यात यावी असे निर्देश देण्यांत आले. नस्तीची संपूर्ण प्रत मिळाल्यामुळे अपीलार्थींच्या सर्व शंकांचे निरसन होवू शकेल. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
जन माहिती अधिकारी यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३० मे, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३३७०६/अपील क्रमांक ३५०४/०२

श्री. महाबीर अर्स -----अपीलार्थी
५०२, सरिता, स्वप्न नगरी,
मुलुंड (पश्चिम) मुंबई - ४०० ०८०.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त -----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, टी विभाग कार्यालय,
मुलुंड (पश्चिम) मुंबई - ४०० ०८०.

२. जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ.व.का.)
बृहन्मुंबई महानगरपालिका, टी विभाग कार्यालय,
मुलुंड (पश्चिम) मुंबई - ४०० ०८०.

*---विवेचन---*

श्री. महाबीर अर्स यांनी दि. ५/२/२००८ रोजी माहितीच्या अर्जान्वये अंबाजी धाम मंदिर, बिलेश्वर मंदिर इ. बाबत माहिती विचारली होती. सदर माहितीच्या अर्जास विहित मुदतीत उत्तर मिळाले नाही त्यामुळे व्यथित होवून त्यांनी दि. ४/४/२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या विरुध्द सहायक आयुक्त यांच्याकडे कलम १९(१) खाली प्रथम अपील दाखल केले होते.

प्रथम अपीलाची सुनावणी आयोजित करण्यात येवून त्यावर दि. १२/५/२००८ रोजी आदेश पारित करण्यात आले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी आदेश देऊन सुध्दा सदर माहिती प्राप्त न झाल्याने श्री. महाबीर अर्स यांनी कलम १९(३) खाली राज्य माहिती आयोगाकडे दि. २०/८/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. या अपीलाची सुनावणी

दि. १७/१२/२००८ रोजी घेण्यांत आली. सदर सुनावणीसाठी अपीलार्थी श्री. महाबीर अर्स तसेच जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते.

सुनावणी दरम्यान अपीलार्थी व संबंधित जन माहिती अधिकारी यांचे तोंडी जबाब व उपलब्ध कागदपत्रांचा साकल्याने विचार करण्यात आला.

सहायक आयुक्त "टी" विभाग यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे.

" यासंदर्भात श्री. महाबीर अर्स यांच्या दि. ५/२/२००८ च्या मुळ अर्जावर सहायक आयुक्त कार्यालयातर्फे क्र.एसीटी/७५९३/एईबीएफटी दि.५/५/२००८ अन्वये उत्तर देऊन निकाली काढण्यात आला. त्याअगोदर अपीलार्थीस जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (बिल्डींग व फॅक्टरी) यांनी दि. ७/३/२००८ च्या पत्राने अंबाजी धाम टेंपल हे खाजगी प्लॉटवर आहे व त्यांचे डॉक्यूमेटस् तपासण्यात येत आहेत. इतर दोन मंदिराबाबत सहायक अभियंता (मेंटेनन्स) टी वार्ड यांचेशी संपर्क साधण्यास कळविले. तद्नंतर श्री. महाबीर अर्स यांनी सहायक आयुक्टी "टी" विभाग यांच्या दालनांत दि. १७/५/२००८ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. सदर सुनावणीच्या अनुषंगाने दिलेले आदेश श्री.महाबीर अर्स यांना पत्र क्र. एईबीएफटी/३२/जन दि. १२/५/२००८ अन्वये कळविण्यात आले. अंबाजी धाम मंदिर या जुन्या बांधकामाच्या वापरातल्या बदलाबाबत अभिप्राय देण्याकरिता कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) पूर्व उपनगरे या खात्याला क्र.एईबीएफ/३२/जन दि. २६/५/२००८ अन्वये कळविण्यात आले. त्यावर सदर खात्यातर्फे मुळ मंजूर कागदपत्रांच्या प्रती मागविण्यात आल्या. त्यानुसार विश्वस्त श्री. अंबाजी धाम यांना एईबीएफटी/११६/जन दि. ४/४/२००८ अन्वये सदर बांधकामाच्या वैधतेबाबत कागदोपत्री पुरावा सादर करण्यासंबंधी कळविण्यात आले. परंतु अद्यापि त्यांचेकडून याबाबत कुठलाही पुरावा आजतागायत सादर करण्यात आलेला नाही. सदर बाबत पुढील कार्यवाही महापालिका कायद्याअंतर्गत लवकरच करण्यात येईल. तसेच अपीलाच्या सुनावणीच्या अनुषंगाने परिरक्षण खात्यातर्फे उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती श्री. महाबीर अर्स यांना देण्यात आल्या आहेत. तसेच अपीलार्थीस तसे एईएमटी/५१५/जन दि.

२७/८/२००८ अन्वये कळविण्यात आले आहे. अपीलार्थीनी विचारलेल्या माहितीपैकी अवैध बिनशेती वापराबाबतची माहिती सहायक आयुक्त कार्यालयात उपलब्ध नाही.

श्री.महाबीर अर्स यांनी वेळोवेळी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये सहायक आयुक्त कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जावर विहित कालावधी "टी" विभागात उपलब्ध माहिती पुरविण्यात आलेली आहे. "

तसेच नंतर झालेल्या कारवाईची माहिती तसेच अतिरिक्त माहिती अपीलार्थीस दि. २७ ऑगस्ट, २००८ रोजीच्या दोन पत्रांनी दिलेली आहे. तसेच दि. २३/९/२००८ रोजीच्या पत्राने काही खुलासाहि केलेला आहे. तसेच अपीलार्थीनी नस्तीचे अवलोकन करुन त्यांना हवी असलेली कागदपत्रे प्राप्त करुन घेतलेली आहेत.

आपल्या कार्यालयात उपलब्ध असणारी माहिती देवून, उर्वरित माहिती जेथे उपलब्ध आहे त्या कार्यालयाकडे अर्ज पाठवून विहित मुदतीच्या आत जन माहिती अधिकारी हे माहितीच्या कायद्याची बूज राखू शकले असते. तथापि, जन माहिती अधिकारी हे आपले कर्तव्य मुदतीत बजावण्यात अपयशी ठरल्याचे याठिकाणी दिसून येते. याबद्दल त्यांचेवर नाममात्र रु. २०००/- (रुपये दोन हजार फक्त) ची शास्ती लादण्यात येत आहे. ती त्यांच्या माहे जुलै २००९ रोजी होणा-या पगारातून वसूल करुन ती शासनाने विहित केलेल्या बजेट हेड खाली जमा करावी व जमा केलेल्या रक्कमेची चलनाची प्रत आयोगास सादर करावी.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी उर्वरित माहिती द्यावी.

तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी वर निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही करावी व पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३० मे, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३७७३४/अपील क्रमांक ४०७३/०२

श्री. मोहनलाल रामजीलाल गुप्ता -----अपीलार्थी
बी/५१, मायकेल अपार्टमेंट,
पी.के. रोड, मुलुंड (पश्चिम) मुंबई ४०० ०८०.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त -----उत्तरवादी
परिमंडळ ६, चेंबूर, मुंबई.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पूर्व प्रादेशिक विभाग नियंत्रण कक्ष,
चेंबूर, मुंबई.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १ जानेवारी, २००९
सुनावणीची तारीख २३/३/२००९
जन माहिती अधिकारी उपस्थित.

श्री. मोहनलाल रामजीलाल गुप्ता यांनी दि. ३/९/२००८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मागितली होती.

१. पोलीस वेबसाईट वर निनावी खोटी तक्रार देणे हा गुन्हा होतो काय १

२. इंटरनेट वापर करणारे यांना ते वापर करीत असलेले इंटरनेट संबंधी रेकॉर्ड ठेवणे बंधनकारक आहे काय १

३. तक्रार क्र. ७०७६/०८ , ७०७७/०८ दि. २८/२/२००८ व ८७८५/०८ दि. १९/७/२००८ व ९२३१/०८ दि. ३१/८/०८ च्या प्रती

४. तक्रारींची सद्य:स्थिती

५. छायांकित प्रती मिळण्यासाठी लागणारा कालावधी

६. इंटरनेटचा गैरवापर केल्याबाबत तसेच खोटी तक्रार केल्याबाबत कोणती कारवाई करण्यात येत आहे.

उपरोक्त अर्जाला जन माहिती अधिकारी यांनी दि. २२/९/२००८ रोजी उत्तर दिले. जन माहिती अधिका-यांच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थीनी दि. ८/१०/२००८ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपील दाखल केले. अपीलार्थींनी मागणी केलेली माहिती मुलुंड पोलीस ठाण्याकडून उपलब्ध होऊ शकते. तेव्हा ती माहिती जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग नियंत्रण कक्ष, चेंबूर, मुंबई यांनी अपीलार्थींना द्यावी असे असे नमूद करुन अपील मान्य केले व त्याबाबत दि. ४/११/२००८ चे आदेश देण्यांत आले.

अपीलावरील निर्णयानुसार जन माहिती अधिका-यांनी दि. ३/१२/२००८ च्या पत्रानुसार अपीलार्थींना माहिती पुरविली. परंतु यावर समाधान न झाल्याने अपीलार्थींनी दि. १/१/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांनी त्यांचे म्हणणे मांडले. अपीलार्थींनी दिलेला अर्ज व त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर याचे अवलोकन केले असता असे दिसते की, अपीलार्थींना समर्पक उत्तर देण्यांत आलेले आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३० मे, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.